१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | बुधवार । दि. ३० सप्टेंबर २०२६ । अंक ११४ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ | । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### २ ऑक्टोबरला 'यूपीआय बंद' आंदोलन

**मुंबई :** यूपीआय व्यवहारांवर आकारण्यात येणाऱ्या व्यापारी सवलत दर (एमडीआर) शुल्काला विरोध करण्यासाठी राज्यातील सुमारे ५०० व्यापारी संघटना २ ऑक्टोबरला 'यूपीआय बंद' आंदोलन करणार आहेत. या दिवशी व्यापारी कोणतेही डिजिटल पेमेंट स्वीकारणार नसून, केवळ रोख व्यवहार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या शुल्कामुळे लहान व मध्यम व्यापाऱ्यांच्या खर्चात वाढ होऊ शकते, असा व्यापारी संघटनांचा दावा आहे. याबाबत मुख्यमंत्री आणि केंद्रीय अर्थमंत्र्यांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याची माहिती रवींद्र माणगावे यांनी दिली.

### मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध?

**नवी दिल्ली :** लहान मुलांकडून सोशल मीडियाचा वाढता वापर आणि त्यांच्यापर्यंत पोहोचणाऱ्या आक्षेपार्ह कंटेंटच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. सोशल मीडिया कंपन्यांनी भारतीय कायद्यांचे पालन करावे, यासाठी आवश्यक वैधानिक पावले उचलावीत, अशी सूचना न्यायालयाने केली. 'जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन अलायन्स' या बिगर सरकारी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने मुलांच्या डिजिटल सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली.

## खालापूर, पनवेलमध्ये वादळाचा तडाखा

# परतीच्या पावसाचा धुमाकूळ!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पावसाने दडी मारल्याने उन्हाच्या चटक्यांनी हैराण झालेल्या रायगडकरांना मंगळवारी परतीच्या पावसाने दिलासा दिला. मात्र, खालापूर आणि पनवेल तालुक्याला पावसासोबत आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने चांगलाच तडाखा दिला. अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या रस्त्यावर कोसळल्या, विजेचे पोल पडले आणि वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. काही मार्गांवर वाहतूक मंदावून कोंडीची परिस्थिती निर्माण झाली.

हवामान विभागाने मंगळवारी (दि.२९) जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी केला होता. त्यानुसार खालापूर, पनवेल, महाड, रोहा आणि पेण तालुक्यांत विविध ठिकाणी परतीच्या पावसाने हजेरी लावली. मात्र, खालापूर आणि पनवेलमध्ये पावसाचा जोर अधिक राहिला. दुपारनंतर खालापूर तालुक्यात अचानक पावसाचा जोर वाढला. मुसळधार पावसासोबत सोसाट्याचा वारा सुटल्याने रस्त्यालगतच्या झाडांच्या मोठ्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या. त्यामुळे काही मार्गांवरील वाहतूक विस्कळीत झाली.



झाडांच्या फांद्या, विजेचे पोल कोसळले

### घरांचे पत्रे उडाले

दुपारनंतर सोसाट्याच्या वादळी वाऱ्यासह आलेल्या जोरदार पावसामुळे खालापुरात अनेक घरांच्या छपरांचे पत्रे उडाले. त्यामुळे अनेकांची तारांबळ उडाली. घरांमधील मौल्यवान वस्तूंचेदेखील यामुळे नुकसान झाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले. अचानक आलेल्या पावसाने घराबाहेर पडलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. पावसामुळे त्यांची मोठी गैरसोय झाली.

वादळी वाऱ्याचा फटका वीज यंत्रणेलाही बसला. काही ठिकाणी वीजपोल कोसळल्याने तसेच वीजवाहिन्यांमध्ये बिघाड झाल्याने अनेक गावांतील वीजपुरवठा कित्येक तास •>पान २ वर

## 'ज्ञानेश कुमार हटाव'चा

# मुंबईत हुंकार!

**राजीनाम्यासाठी डाव्या पक्षांचा एल्गार; गुरुवारी आझाद मैदानात आंदोलनाची हाक**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मुंबईत आंदोलनाची तयारी सुरू झाली आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर, मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या प्रक्रियेवर आणि मतदारांच्या हक्कांशी संबंधित मुद्द्यांवरून डाव्या विचारांच्या पक्षांनी आक्रमक भूमिका घेतली असून, गुरुवारी (दि.१) दुपारी ३ वाजता मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनाची हाक दिली आहे.

या आंदोलनात शेतकरी कामगार पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष मा.ले. तसेच अन्य डाव्या विचारांचे पक्ष सहभागी होणार असल्याचे शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा ॲड. साम्या कोरडे यांनी सांगितले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि मतदारांच्या अधिकारांचा मुद्दा पुढे नेण्याची भूमिका पुरोगामी विचारांच्या पक्षांकडून मांडली जात आहे.

**ज्ञानेश कुमार, बस्स झालं!**

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी तसेच त्यांनी केलेला प्रताप लोकशाहीविरोधी असून, त्यांना अटक करावी, ही या आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. एसआयआर प्रक्रियेदरम्यान मतदारांची नावे वगळली जात असल्याचा दावा ॲड. साम्या कोरडे यांनी केला असून, अशा प्रक्रियेमुळे मतदारांच्या मतदानाच्या अधिकारावर परिणाम होऊ शकतो, असा आक्षेपही त्यांनी नोंदविला आहे. एसआयआर प्रक्रियेवरून निर्माण झालेल्या प्रश्नांना जबाबदार कोण, मतदारयादीतील बदलांची जबाबदारी कोणाची आणि निवडणूक प्रक्रियेत उत्तरदायित्व •>पान २ वर

### आझाद मैदानात घोषणांचा गजर

१ ऑक्टोबरला दुपारी ३ वाजता आझाद मैदानात होणाऱ्या आंदोलनात शेकापचे राज्य कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा ॲड. साम्या कोरडे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. मिलिंद रानडे, भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. शैलेंद्र कांबळे, भारतीय कम्युनिस्ट पक्ष मा.ले.चे डॉ. विजय कुलकर्णी तसेच डाव्या पक्षांचे कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. यावेळी राजीनाम्याच्या मागणीसह एसआयआर प्रक्रियेवरून सरकार आणि निवडणूक आयोगाला जाब विचारण्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.

**वेधक**

### महाड स्फोटप्रकरणी नऊ जणांवर गुन्हा



**महाड :** महाड एमआयडीसीतील प्लॉट क्रमांक सी-५७ येथील सिनर्जीया केम इंडस्ट्रीज कंपनीत दोन दिवसांपूर्वी रात्री दहाच्या सुमारास झालेल्या भीषण स्फोटप्रकरणी कंपनीतील नऊ जणांविरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या स्फोटात दोन कामगार गंभीर जखमी झाले असून, कंपनीचे तसेच परिसरातील अन्य कंपन्यांचेही नुकसान झाल्याचे समोर आले आहे. •>पान २ वर

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**रसायनी :** खालापूर तालुक्यातील वडगाव आदिवासीवाडी परिसरात अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा पीडित मुलीच्या बहिणीचा दीर आहे. आरोपीने मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही तिच्याशी जवळीक साधून लग्नाचे आमिष दाखविल्याचा आरोप आहे. त्यानंतर तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याने ती गर्भवती झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात २९ सप्टेंबर रोजी करण्यात आला. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास फिर्यादी हे अन्न टाकण्यासाठी गेले असता सेक्टर ३५, खारघर तलावाच्या बाजूला बसलेला अनोळखी इसम सिगारेट ओढत होता. यावेळी त्याला सिगारेट पिऊ नको असे सांगितले असता त्याने फिर्यादी आणि त्यांची पत्नी यांच्यासोबत भांडण केले. आणि दगडाने मारहाण करून शिवीगाळ केली तसेच फिर्यादी यांच्या पत्नीचा विनयभंग गेला.

# आमदारांच्या घरचेच जमिनीचे दलाल!

- सुधाकर घारेंचा महेंद्र थोरवेंवर घणाघाती हल्ला
- कोंढाणे धरणाच्या जमीन व्यवहारावरून आरोप-प्रत्यारोपांना धार



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कोंढाणे धरणाच्या जमिनीच्या व्यवहारावरून कर्जत तालुक्यातील राजकारण चांगलेच तापले असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्यावर थेट हल्लाबोल केला आहे. आमदारांच्या घरचे आणि जवळचेच धरणाच्या जमिनीची दलाली करतात, असा गंभीर आरोप घारे यांनी केला. आदिवासी आणि जनतेची फसवणूक होत असल्याचा दावा करत घारे यांनी थोरवेंच्या आरोपांची पत्रकार परिषदेत जोरदार चिरफाड केली.

घारे म्हणाले की, आमदार महेंद्र थोरवे यांनी एक दिवसापूर्वी पत्रकार परिषद घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसवर कोंढाणे धरणाच्या जमिनीबाबत आरोप केले होते. बोगस पट्टे आणून ७०-बच्या माध्यमातून जमीन लाटण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा थोरवे यांनी केला होता. त्यावर पलटवार करत घारे यांनी, आदिवासींच्या जमिनी विकणारे नक्की कोण, हे कर्जत तालुक्यातील जनतेला माहिती आहे. तालुक्यात धरणे आणली आणि त्या धरणासाठी लागणारी जमीन विकण्याची जबाबदारी थोरवेंचे बगलबच्चे करीत आहेत, असा आरोप केला.

महेंद्र थोरवे २० वर्षांपूर्वी कुठे होते, असा सवालही •>पान २ वर

### महिलेवर चाकू रोखून लूट

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

चहाच्या टपरीवर असलेल्या महिलेला चाकूचा धाक दाखवून तिचे मंगळसूत्र, अंगठी, मोबाईल आणि रोख रक्कम लुटणाऱ्या टोळीतील एका आरोपीला गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेलच्या पथकाने अवघ्या चार तासांत अटक केली. त्याच्याकडून चोरीचा मोबाईल, गुन्ह्यात वापरलेला चाकू, दोन लोखंडी कोयते आणि काळ्या रंगाची बॅग हस्तगत करण्यात आली. या प्रकरणातील अन्य तीन आरोपींचा शोध सुरू आहे.

बारवई येथे ही घटना घडली. चार •>पान २ वर

# मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर कंटेनर पलटी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, मंगळवारी सकाळी ब्रेक फेल झालेल्या कंटेनरने सुरक्षा कठड्याला जोरदार धडक देत कठड्याच्या पलीकडे पलटी झाला. ही घटना बोरघाटात खोपोली एक्झिटजवळ घडली. या अपघातात कंटेनर चालक जखमी झाला असून, कंटेनरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनर क्रमांक एमएच ४६ बीयू ४३९९ हा पुण्याहून मुंबईच्या दिशेने जात होता. बोरघाटातील खोपोली एक्झिटजवळ येताच कंटेनरचा ब्रेक फेल झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कंटेनरने समोरील सुरक्षा कठड्याला जोरदार धडक दिली. धडकेनंतर कंटेनर कठड्याच्या पलीकडे जाऊन पलटी झाला. या अपघातात चालक जखमी झाला असून, •>पान २ वर

# कौशल्याला रोजगाराची जोड द्या!

**जिल्हाधिकारी जावळेंचे युवकांना आवाहन**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

बदलत्या रोजगाराच्या गरजा लक्षात घेता युवकांनी केवळ पदवीवर अवलंबून न राहता विविध क्षेत्रांतील कौशल्य आत्मसात करून रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी मिळवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभा' अंतर्गत रायगड जिल्ह्यातील जिल्हास्तरीय उपक्रमाचा शुभारंभ मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते अलिबाग येथील जे.एस.एम. महाविद्यालयात झाला.



अलिबागमध्ये 'रोजगार महाकुंभा'चा शुभारंभ

सेवा संकल्प अभियानांतर्गत कोकण व नाशिक विभागात एकाच दिवशी ४०० हून अधिक ठिकाणी, तर रायगड जिल्ह्यात १२ ठिकाणी रोजगार मेळावे व प्लेसमेंट उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या माध्यमातून युवकांना विविध उद्योग व रोजगारदात्यांशी थेट संवाद साधून उपलब्ध संधींची माहिती घेता आली.

यावेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी युवकांनी तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य, संगणकाचे ज्ञान आणि उद्योगाच्या गरजेनुसार आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यावर भर द्यावा, असे सांगितले. कौशल्यामुळे रोजगारक्षमता वाढण्याबरोबरच स्वयंरोजगाराच्या संधीही निर्माण होतात, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. ॲड. गौतम पाटील, जे.एस.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्य सोनाली पाटील, उपप्राचार्य श्री. गायकवाड, विविध उद्योगांचे प्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी व रोजगाराच्या शोधात असलेले उमेदवार उपस्थित होते.






# वाद्य खरेदीत २.४० कोटींचा ‘सूर’ कुणाच्या तालावर?

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेकडून झालेल्या तब्बल २.४० कोटींच्या वाद्य साहित्य खरेदीने नव्या प्रश्नांना तोंड फोडले आहे. प्रतिसंच सुमारे २० हजार रुपये दराने १,२०० संचांची खरेदी झाल्याची प्राथमिक माहिती असून, साहित्याचा दर, दर्जा आणि प्रत्यक्ष वितरणावर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यामुळे वाद्य खरेदीत २.४० कोटींचा सूर कुणाच्या तालावर? असा थेट सवाल उपस्थित करत संपूर्ण खरेदी व्यवहाराची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून करण्यात आली आहे.

उपलब्धप्राथमिकमाहितीनुसार, जिल्हा परिषदेकडून भवन साहित्य आणि वाद्य साहित्य संचांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यात आली. काही लाभार्थ्यांकडून साहित्य निकृष्ट असल्याच्या तसेच वाद्ये फुटल्याच्या तक्रारी असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, प्रत्यक्ष बाजारभाव, निविदा प्रक्रिया, जीएसटी, वाहतूक, हमी, साहित्याची गुणवत्ता आणि वितरणाच्या नोंदी तपासल्यानंतरच खरेदीत आर्थिक अनियमितता झाली की नाही, हे स्पष्ट होणार आहे.




### २.४० कोटींच्या खरेदीचा हिशेब तपासा

वाद्य साहित्याची निविदा, मंजुरी, प्रत्यक्ष खरेदी दर, बाजारभाव, बिले, भुगतान, स्टॉक रजिस्टर, गुणवत्ता आणि वितरण यांची स्वतंत्र तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. साहित्य निकृष्ट आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### दोन्ही प्रकरणाचे दुवे समान?

लाचप्रकरण आणि वाद्य साहित्य खरेदी स्वतंत्रपणे तपासावी. मात्र समान पुरवठादार, मध्यस्थ, अधिकारी, बँक खाते, मोबाईल संपर्क किंवा निर्णयप्रक्रियेतील व्यक्ती यांचा संबंध आढळल्यास त्या दुव्यांचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### तपास फक्त दीड लाखांपुरता नको!

शिक्षक बदलीतील कथित लाच प्रकरणात पीएने स्वतः च्या स्तरावर व्यवहार केला की वरिष्ठांच्या निर्देशाने किंवा त्यांच्या माहितीतून मध्यस्थ म्हणून काम केले, याची पुराव्यांच्या आधारे चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित संवाद, फाइल्स, आर्थिक व्यवहार आणि संभाव्य लाभार्थी साखळी तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, शिक्षक बदलीसाठी दीड लाख रुपयांच्या कथित लाच प्रकरणात जिल्हा परिषद अध्यक्षाचा स्वीय सहाय्यक योगेश भस्मे याच्यावर एसीबी कारवाई झाल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेतील आर्थिक व्यवहारांवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, दोन्ही प्रकरणांचा परस्पर संबंध असल्याचे सिद्ध झालेले नसून, संबंधित व्यवहार स्वतंत्रपणे तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

- प्रतिसंच २० हजार दर
- दर्जा अन् वितरणावर गंभीर सवाल
- संपूर्ण व्यवहाराच्या चौकशीची मागणी

या मागणीचे निवेदन जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांना देण्यात आले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, जिल्हा सल्लागार सतीश पाटील, अलिबाग तालुका प्रमुख शंकर गुरव, पेण तालुका प्रमुख समीर म्हात्रे, विभाग प्रमुख प्रकाश पाटील, योगेश जुईकर, गिरीश शेळके, शशी गावंड, उपतालुका प्रमुख संतोष पाटील, जयराज तांडेल, पेण युवासेना तालुका अधिकारी योगेश पाटील आणि भगवान पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# रेशनच्या गव्हात उंदराच्या लेंड्या, किडी!

। खोपोली । प्रतिनिधी ।

गरीबांच्या ताटात जाणाऱ्या रेशनच्या गव्हातच उंदराच्या लेंड्या आणि किडी आढळल्याने खालापूर तालुक्यातील कुंभीवली येथे संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांच्या आरोग्यासाठी वितरित होणाऱ्या धान्याच्या गुणवत्तेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकाराची तातडीने चौकशी करण्याची मागणी होत आहे. धामणी गावातील ग्राहक रोहित संतोष लोते यांनी २८ सप्टेंबर रोजी पुरवठा विभागाकडे निवेदन देऊन संबंधित धान्याची तपासणी करून दुकानदारावर कारवाईची मागणी केली आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांतर्गत गरीब आणि गरजू कुटुंबांना सवलतीच्या दरात गहू व तांदूळ वितरित केला जातो. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह याच धान्यावर अवलंबून असताना कुंभीवली येथील रेशन दुकानातून मिळालेल्या गव्हात किडी आणि उंदराच्या लेंड्या आढळल्याने ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

रोहित लोते यांनी पुरवठा अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात, नागरिकांच्या वापरासाठी वितरित होणाऱ्या गव्हामध्ये किडी व उंदराच्या लेंड्या आढळणे ही गंभीर बाब असल्याचे म्हटले आहे. संबंधित गव्हाची तपासणी करून त्याचा दर्जा व सुरक्षितता तपासावी, तसेच रेशन दुकानातील उपलब्ध धान्याची पाहणी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, खराब किंवा निकृष्ट धान्य ग्राहकांच्या माथी मारले जात असल्यास पुरवठा विभागाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी रेशन कार्डधारकांकडून होत आहे. खराब धान्य देऊन आमच्या आरोग्याशी खेळ केला जात आहे का? असा सवालही ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे.

- कुंभीवलीत निकृष्ट धान्याचा धक्कादायक प्रकार
- ग्राहकांच्या आरोग्याशी खेळाचा आरोप
- दुकानदाराला पुरवठा विभागाची नोटीस



> “रेशन दुकानात शासनाकडून आलेल्या धान्यामध्ये कचरा, खराब वस्तू किंवा निकृष्ट धान्य आढळल्यास ते ग्राहकांना वितरित करू नये. सदर धान्य गोडाऊनमध्ये जमा करून नवीन धान्य घ्यावे, अशा सूचना सर्व रेशन दुकानदारांना देण्यात आल्या आहेत. कुंभीवली येथील दुकानदाराविरोधात ग्राहकाचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर तात्काळ नोटीस बजावण्यात आली असून, नवीन धान्य वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याप्रकरणी चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
> – मनोज पवार, पुरवठा अधिकारी, खालापूर”

### दुकानदाराला तातडीने नोटीस

ग्राहकाचे निवेदन प्राप्त होताच पुरवठा विभागाने कुंभीवली येथील संबंधित दुकानदाराला नोटीस बजावली आहे. उपलब्ध धान्याबाबत चौकशी करून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

# वेळेअभावी कर सल्लागार अन् सीएंवर प्रचंड ताण

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

प्राप्तीकर विवरणपत्र आणि टॅक्स ऑडिट रिपोर्ट सादर करण्यासाठी अपुरा कालावधी मिळत असल्याने देशभरातील चार्टर्ड अकाउंटंट्स आणि कर सल्लागारांवर कामाचा मोठा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे टॅक्स ऑडिटची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६, तर ऑडिट केससाठी आयटीआर भरण्याची मुदत ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढवावी, अशी मागणी होत आहे.

- टॅक्स ऑडिटची मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत
- आयटीआरची ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्याची मागणी

### सर्वोच्च न्यायालयात याचिका

मुदतवाढीसाठी राजस्थान टॅक्स बार असोसिएशनने राजस्थान उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. २५ सप्टेंबरच्या सुनावणीत सीबीडीटीने अधिकृत उत्तर सादर करण्यासाठी २८ सप्टेंबरपर्यंत वेळ मागितला. त्यामुळे आता न्यायालयीन सुनावणी आणि केंद्र सरकारच्या भूमिकेकडे देशभरातील कर सल्लागारांचे लक्ष लागले आहे. मध्य प्रदेशातही यासंदर्भात दोन याचिका दाखल झाल्या आहेत.

आकारणी वर्ष २०२६-२७ साठी नॉन-ऑडिट करदात्यांना आयटीआर भरण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत देण्यात आली. त्यामुळे टॅक्स ऑडिटसाठी प्रत्यक्षात अवघा एक महिना उपलब्ध झाला आहे.

> “नॉन-ऑडिट विवरणपत्रांची मुदत ऑगस्टअखेरपर्यंत वाढल्याने टॅक्स ऑडिटसाठी अवघा एक महिना उरला आहे. एवढ्या कमी वेळेत अचूक आणि गुणवत्तापूर्ण काम करणे सीए व कर सल्लागारांसाठी मानसिक आणि व्यावहारिक ताणाचे ठरत आहे. टॅक्स ऑडिटची मुदत ३१ ऑक्टोबर आणि आयटीआरची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यासाठी कोणताही तांत्रिक अडथळा नाही. करदाते आणि व्यावसायिकांच्या हितासाठी सरकारने तातडीने निर्णय घ्यावा. – विशाल खामसेरा (कळंबोली-रायगड) यांनी केली.”

# जनावरांच्या वाहतुकीप्रकरणी गुन्हा दाखल

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

टेम्पोमध्ये जनावरांची दाटीवाटीने कोंबून वाहतूक केल्याप्रकरणी अखिल अहमद शाह यांच्या विरोधात २८ सप्टेंबर रोजी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

२८ सप्टेंबर रोजी वाहन क्रमांक एम एच ४७ बीवाय ४८२७ चा टेम्पो चालक अखिल अहमद शहा यांनी टेम्पोमध्ये १६ जनावरे परवान्यामध्ये नमूद वजन क्षमतेपेक्षा जास्त वजनाची जनावरे दाटीवाटीने कोंबून वाहतूक केली आणि जनावरांना क्रूरतेची वागणूक दिली. याप्रकरणी पोलिसांनी टेम्पो आणि जनावरे ताब्यात घेतली.

## पान १ वरुन

### परतीच्या पावसाचा धुमाकूळ!

खंडित राहिला. अचानक वीज गायब झाल्याने नागरिकांना अंधारात राहावे लागले. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू होती. रस्त्यावर कोसळलेल्या फांद्या हटविण्यासाठी स्थानिक नागरिक आणि संबंधित यंत्रणांकडून प्रयत्न करण्यात आले. काही ठिकाणी वाहतूक मंदावल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला.

पनवेल तालुक्यातही काही ठिकाणी तुरळक, तर काही भागांत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. महाड, रोहा आणि पेण तालुक्यांत तुलनेने तुरळक स्वरूपाचा पाऊस झाला. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले, तर शेतकऱ्यांनाही काहीसा दिलासा मिळाला.

दरम्यान, यंदा रायगड जिल्ह्यात पावसाचे आगमन उशिरा झाले. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये अपेक्षित पाऊस न झाल्याने अनेक भागांत पावसाची प्रतीक्षा होती. अशातच मंगळवारी झालेल्या परतीच्या पावसाने नागरिकांना दिलासा दिला. मात्र, खालापूर-पनवेलमध्ये वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीने प्रशासनासमोरही आव्हान उभे केले.

### स्फोटप्रकरणी नऊ जणांवर गुन्हा

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कंपनीतील महत्त्वाचे सेफ्टी मॅनेजरचे पद रिक्त असतानाही ते न भरता अप्रशिक्षित कामगारांकडून धोकादायक यंत्रणा व पदार्थ हाताळण्याचे काम करून घेतल्याचा आरोप आहे. कामगारांकडून झालेल्या निष्काळजीपणामुळे रियाक्टरमध्ये आग लागून त्यानंतर स्फोट झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेत दोन कामगार गंभीर जखमी झाले असून, स्फोटामुळे कंपनीच्या मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. तसेच स्फोटाचा फटका आजूबाजूच्या कंपन्यांनाही बसल्याचे सांगण्यात येत आहे. याप्रकरणी कंपनीतील प्रोडक्शन मॅनेजर, सुपरवायझर, ऑपरेटर तसेच इतर कामगार अशा एकूण नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, अनिष मदनमोहन राय (प्रोडक्शन मॅनेजर), रा. सोमजाई मंदिर, ता. महाड, जि. रायगड, यश गणेश निवग्णे (सुपरवायझर), रा. नातेखिंड, नितीन लक्ष्मण लाड (ऑपरेटर), रा. वरंडोली, ता. महाड, जि. रायगड, अफसर हसेन, रा. बरान्डा, संत कबीरनगर, उत्तर प्रदेश, महमद नासीर, रा. धुलखोरा, पो. लखोरा, मथीहारी, पूर्वी चंपारण, बिहार, मकश राजवंशी, रा. मनोकपुरा, नवादा, बिहार, विठ्ठल तुकाराम खेडेकर, रा. कनगुले, ता. पोलादपूर, प्रदिम राम, रा. कप्रीनगर, नवादा, बिहार, विवेक लक्ष्मण पड्याल, रा. दासगाव, ता. महाड या नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनंत रावडे करीत आहेत.

### ...मुंबईत हुंकार!

निश्चित कसे होणार, असे सवाल आंदोलनकर्त्यांकडून उपस्थित करण्यात येत आहेत.

**डाव्यांची एकजूट; आंदोलनाची दिशा स्पष्ट**

शेतकरी कामगार पक्षासह भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष मा.ले. आणि अन्य डाव्या पक्षांच्या सहभागामुळे मुंबईतील आंदोलनाला व्यापक स्वरूप मिळणार आहे. निवडणूक आयोगाची कार्यपद्धती, प्रक्रिया आणि मतदारांच्या अधिकारांचा प्रश्न या मुद्द्यांवरून केंद्रित आंदोलन उभे करण्याची तयारी या पक्षांकडून केली जात आहे. ‘ज्ञानेश कुमार, बस्स झालं!’ या घोषणेसह राजीनाम्याची मागणी लावून धरत आंदोलनाची तीव्रता वाढवण्याचा निर्धार डाव्या पक्षांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

लोकशाही वाचवा, मतदानाचा अधिकार जपा

मतदारयादीतील नाव हा केवळ प्रशासकीय नोंदीचा विषय नसून तो नागरिकांच्या मतदानाच्या घटनात्मक अधिकाराशी संबंधित असल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांकडून मांडली जात आहे. त्यामुळे कोणत्याही पात्र मतदाराचे नाव प्रक्रियात्मक त्रुटींमुळे वगळले जाऊ नये, यासाठी स्पष्ट आणि पारदर्शक यंत्रणा आवश्यक असल्याचा आग्रह डाव्या पक्षांकडून धरला जात आहे.

### मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर कंटेनर पलटी

त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातामुळे कंटेनरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दरम्यान, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गेल्या तीन दिवसांत सलग तीन अपघात झाले आहेत. या तीन अपघातांमध्ये आतापर्यंत तीन जणांचा मृत्यू, तर दोन जण जखमी झाले आहेत. त्यामुळे बोरघाटातील अपघातांची वाढती मालिका पुन्हा एकदा चिंतेचा विषय ठरत आहे.

### महिलेवर चाकू रोखून लूट

आरोपींनी मीना कातकरी यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र, अंगठी, मोबाईल फोन आणि रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. याप्रकरणी रात्री पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी चोरीला गेलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण सुरू केले. या तपासातून मिळालेल्या माहितीच्या आधारे इंदापूर पोलिसांच्या मदतीने मंगेश देसाई काळे ऊर्फ राहुल कांता राज पवार ऊर्फ मंजू (१९) याला ताब्यात घेण्यात आले. तो सध्या सरडेवाडी, इंदापूर येथे राहत असून मूळचा डोमेगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथील आहे.

पोलिसांच्या तपासात आरोपीकडून पनवेल तालुका पोलीस ठाण्यातील जबरी चोरीच्या गुन्ह्यासह शहापूर पोलीस ठाणे, इचलकरंजी, कोल्हापूर येथील आणखी एक गुन्हा उघडकीस आल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणातील रोहित देसाई पवार (२१), शायद गणेश काळे (२२) आणि आकाश काळे (२१) हे तीन आरोपी अद्याप फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### आमदारांच्या घरचेच जमिनीचे दलाल!

घारे यांनी उपस्थित केला. २००७ पर्यंत थोरवेंनी कोणते व्यवहार केले, याची माहिती कर्जत तालुक्यातील जनतेला असल्याचा दावा त्यांनी केला. थोरवेंच्या आर्थिक व्यवहारांची ईडीमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी करतानाच माझीही ईडी चौकशी करा, असे आव्हान घारे यांनी दिले.

शिवसैनिकांच्या मुद्द्यावरूनही घारे यांनी थोरवेंना लक्ष्य केले. २०१९ मध्ये शिवसैनिकांनी निवडून दिले, असे सांगणारे थोरवे आमदार झाल्यानंतर त्याच शिवसैनिकांच्या विरोधात गेल्याचा आरोप त्यांनी केला. भरत भगत यांच्यामुळे आपण निवडून आल्याचे सांगणारे थोरवे यांनी त्यांनाच जेलमध्ये टाकण्यासाठी प्रयत्न केल्याचा आरोप घारे यांनी केला. तसेच, तुमच्याच पक्षाचे प्रसाद सावंत यांना कशासाठी मारहाण केली? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# शिलार धरणविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार!

## २४ गावांतील शेतकरी-ग्रामस्थांचा निर्धार

। नेरळ । प्रतिनिधी ।

प्रस्तावित शिलार धरणाविरोधातील शेतकऱ्यांचा विरोध आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. ‘‘धरण नकोच!’’ अशी भूमिका घेत २४ गावे आणि आदिवासी वाड्यांतील शेतकरी-ग्रामस्थांनी आता स्थानिक राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी घेऊन पाठिंबा मिळविण्याची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेची अंतिम पायरी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शिलार धरण प्रकल्प कायमचा हद्दपार करण्यासाठी साकडे घालण्याची असेल.



शिलार धरणाला सुरुवातीपासूनच स्थानिकांचा विरोध असून, यापूर्वी आंदोलनांसह कर्जत तहसील कार्यालयावर मोर्चाही काढण्यात आला आहे. मात्र, विरोध असतानाही जमीन मोजणीचे काम सुरू झाल्याने शेतकऱ्यांनी आता गावोगावी बैठका घेण्याचा निर्णय घेतला आहे. शेती, जंगल आणि गावांचे अस्तित्व वाचवण्यासाठी शिलार धरणाविरोधातील लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

१ ऑक्टोबरपासून ‘शिलार धरण हद्दपार’ मोहीम सुरू होणार असून, प्रकल्पबाधित क्षेत्रातील हजारो शेतकरी कर्जत येथे एकत्र येणार आहेत. प्रथम आमदार महेंद्र थोरवे आणि त्यानंतर कर्जत तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांच्या भेटी घेऊन धरणाला विरोध करण्यासाठी सहकार्य मागितले जाणार आहे.

एक-एक पायरी चढत मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचू. शिलार धरण हद्दपार होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# २७ लाख ७७ हजारांची ऑनलाईन फसवणूक

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

ट्रेंडिंगवर २०० टक्के नफ्याचे आमिष दाखवून २७ लाख ७७ हजारची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अनुप्रेमा राजेंद्र आणि चंद्र प्रकाश पडियार यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान फिर्यादी यशवंत रावणंग (राहणार कामोठे) यांना एका व्हाट्सअप ग्रुप वर जॉईन करण्यात आले आणि त्यानंतर पुन्हा दुसऱ्या ग्रुपला जॉईन केले आणि लिंकद्वारे ट्रेडिंग खाते उघडण्यास सांगून ट्रेंडिंगवर २००% नफ्याचे आमिष दाखवले आणि वेगवेगळे बँक खाते देऊन त्यांना आयपीओ च्या नावाने पैसे पाठवण्यास सांगितले व खोटा नफा दाखवला आणि ते पैसे ट्रेडिंग खात्यामधून काढण्याचा प्रयत्न केला असता त्यासाठी कमिशन लागेल असे सांगून आरोपींनी २७ हजार ७७ हजारांची फसवणूक केली.

# एक लाख रुपयांची फसवणूक

**नवीन पनवेल :** सोन्याच्या चैन मध्ये सोने कमी असल्याचे माहित असताना देखील देखील त्याच्या बदल्यात एक लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी कविता प्रसाद मुकादम (करंजाडे) यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २८ सप्टेंबर रोजी पुन्हा दाखल करण्यात आला. कविता मुकादम ह्या नवकार ज्वेलर्स झवेरी बाजार जोशी आळी या दुकानात आल्या आणि त्यांनी त्यांच्या चेनमध्ये २८ टक्के सोने असल्याचे माहिती असूनदेखील चेन १०० टक्के सोन्याचे असल्याचे मोतीलाल जैन यांना सांगितले.

# पालिकेच्या अधीक्षकाची मनसे कार्यकर्त्याला शिवीगाळ

## प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात तक्रार केल्यानेपनवेल महापालिकेच्या प्रभाग अधीक्षकाने मनसेच्या कार्यकर्त्याला अपशब्द वापरून शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. कामोठे परिसरातील या प्रकारानंतर संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी मनसे पदाधिकाऱ्यांनी केली असून, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

प्रभाग ‘क’चे अधीक्षक दशरथ भंडारी यांच्या कार्यक्षेत्रात कामोठे व खांदा कॉलनी परिसरातील फुटपाथ आणि रस्त्यांवर अनधिकृत हातगाड्या, टपऱ्या आणि अन्य व्यवसाय वाढल्याचा आरोप आहे. दिव्यांगांच्या नावाखालीही काही ठिकाणी व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. या अनधिकृत व्यवसायांविरोधात तक्रार केल्यानंतर भंडारी यांनी संबंधित कार्यकर्त्याला अपशब्द वापरल्याचे सांगण्यात आले.

> “कोणालाही अपशब्द वापरू नयेत, याबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत.
> – रविकिरण घोडके, उपायुक्त, पनवेल महापालिका”

# कळंबोलीतील पंपिंग स्टेशनच्या प्रस्तावाला विरोध

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कळंबोली येथील होल्डिंग पाँडमध्ये गेट पंप पंपिंग स्टेशन उभारण्याचा प्रस्ताव अनावश्यक असून, त्यासाठी होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च टाळावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या नगरसेविका व गटनेत्या लीना अर्जुन गरड यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष, सदस्य आणि विरोधी पक्षनेत्यांना निवेदन दिले आहे.

कळंबोलीची भौगोलिक स्थिती आणि समुद्रसपाटीपासून कमी उंचीमुळे अतिवृष्टी व भरती एकाच वेळी आल्यास काही भागांत पाणी साचते. मात्र, या समस्येवर नवीन पंपिंग स्टेशन उभारण्याऐवजी सिडकोने यापूर्वीच तयार केलेल्या होल्डिंग पाँडचा प्रभावी वापर करावा, अशी भूमिका गरड यांनी मांडली आहे.

- जुनी गेट दुरुस्त करण्याची मागणी
- कोट्यवधींच्या खर्चावर लीना गरड यांचे आक्षेप

कळंबोली, रोडपाली आणि मार्बल मार्केट परिसरात सिडकोने सुमारे ३ लाख ५८ हजार ६७० चौरस मीटर क्षेत्रात होल्डिंग पाँड तयार केले आहेत. पाच मीटर खोली गृहीत धरल्यास त्यांची साठवण क्षमता सुमारे १७ लाख ९३ हजार ३५० घनमीटर असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे पाँडवरील नादुरुस्त जुनी गेट दुरुस्त करून चांगल्या दर्जाचे रोलर किंवा माईटर गेट बसविणे अधिक किफायतशीर ठरेल, असे गरड यांनी म्हटले आहे.

२०२६ च्या पावसाळ्यात महापालिकेने भाडेतत्त्वावर पाण्याचा निचरा करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध केली होती. या अनुभवावरून कायमस्वरूपी महागडी यंत्रणा उभारण्याची गरज नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

प्रस्तावातील गेट पंप आणि सबमर्सिबल पंपाच्या किंमतीत मोठी तफावत असल्याचा आक्षेपही निवेदनात घेण्यात आला आहे. तसेच निविदा प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित करून संबंधित बाबींची तांत्रिक व आर्थिक चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे डावाळे ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली संपूर्ण मिळकत विद्यमान मालक श्री. मनोहर काशिनाथ नाईक रा. नाईक आळी पो.नागाव ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे डावाळे ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|
| १६० | ०-३४-८०<br>पो.ख ०-०६-२०<br>०-४१-०० | ६.१९ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात, सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे,

अलिबाग
तारीख :२९/०९/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.

# श्रीवर्धनमध्ये सार्वजनिक विहिरींकडे दुर्लक्ष

■ तालुक्यात पाणीटंचाईचे गंभीर संकट

■ भविष्यात पाणीपुरवठा खंडित होण्याची भीती



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुका दुष्काळग्रस्त जाहीर झाल्याने शहरासह तालुक्यात पाणीटंचाईचे संकट गंभीर होत असताना श्रीवर्धन नगरपरिषदेच्या सार्वजनिक विहिरींच्या दुरवस्थेकडे प्रशासन व नगरसेवकांचे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नगरपरिषदेच्या शहरातील विविध भागांत सुमारे ३५ सार्वजनिक विहिरी असून, त्यापैकी काही विहिरींना शंभर वर्षांहून अधिक काळ झाला आहे. अनेक विहिरींमध्ये सांडपाणी, प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या व इतर कचरा साचल्याने जीवनदायी जलस्रोतांना कचराकुंडीचे स्वरूप आले आहे.

शहराला पाणीपुरवठा करणारे रानवली धरण आटल्याने सध्या एक दिवसाआड केवळ एक तास पाणीपुरवठा केला जात आहे. भविष्यात पाणीपुरवठा पुर्णपणे खंडित होण्याची शक्यता असल्याने नागरिक सार्वजनिक विहिरींकडे पर्यायी जलस्रोत म्हणून पाहत आहेत. मात्र, काही विहिरींचे झरे बुजले असून पाण्याला दुर्गंधी येत आहे. त्यामुळे हे पाणी पिण्यासह कपडे धुणे किंवा अन्य घरगुती वापरासाठी ही अयोग्य ठरत आहे.

कोकणच्या संस्कृतीत विहिरींना जलदेवतेचे स्थान असून चैत्र पौर्णिमेला त्यांची पूजा करण्याची शतकानुशतकांची परंपरा आहे. अशा विहिरींची आज झालेली दयनीय अवस्था चिंताजनक आहे. विशेष म्हणजे सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातील नगरसेवकांच्या प्रभागातही नगरपरिषदेच्या विहिरी आहेत. सर्वसाधारण सभांमध्ये विविध विकासकामांचे मुद्दे अजेंड्यावर घेत असताना विहिरींच्या स्वच्छता व संवर्धनाचा मुद्दा ठोसपणे उपस्थित होत नसणे हे श्रीवर्धन येथील नागरिकांचे दुर्दैव आहे.

रानवली धरण जलशुद्धीकरण प्रकल्पाबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित होत आहेत. जलशुद्धीकरण प्रकल्प असूनही वारंवार गढूळ पाणी येणे तसेच पाण्याचा दाब वाढवल्यानंतर जलवाहिन्या फुटण्याच्या घटना घडत असल्याने जलवाहिन्यांच्या दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.या कामांमध्ये कोट्यवधींच्या गैरव्यवहाराचे आरोप विरोधकांकडून करण्यात आले आहेत; त्याबाबत संबंधितांकडून स्पष्टीकरण अपेक्षित आहे. नगरपरिषदेने सार्वजनिक विहिरींची तातडीने स्वच्छता करावी, गाळ काढावा, बुजलेले झरे मोकळे करावेत, जंतुनाशक औषधांची प्रक्रिया करावी आणि विहिरींचे नियमित संवर्धन करावे. केवळ रानवली धरणावर अवलंबून न राहता सार्वजनिक जलस्रोतांचा उपयोग वाढवून पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

> विहिरींचे पुनरुज्जीवन व संवर्धन नक्कीच केले जाईल.श्रीवर्धन येथील नागरिक पाण्यापासून वंचित राहणार नाही याची नगरपरिषदेकडून दखल घेतली जाईल. भविष्यातील पाणीटंचाई बघता नगरपरिषदेने त्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.
>
> –अनंत गुरव
> उपनगराध्यक्ष श्रीवर्धन नगरपरिषद

**श्रीवर्धन नगर परिषद हद्दीतील एकूण सार्वजनिक विहिरी.:- ३५**

**सांडपाणी गेल्यामुळे दुरवस्था झालेल्या विहिरी.:-0८**

**पायातून ढासळलेल्या विहिरी.:- 0६**

**झरे आटलेल्या विहिरींची संख्या.: अंदाजे १३**

## सिडकोच्या पाणीपुरवठ्यावर श्वेतपत्रिका काढण्याची मागणी

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |




पनवेल महानगरपालिका आणि सिडको क्षेत्रातील सध्याच्या तसेच भविष्यातील पाणीपुरवठ्याबाबत अधिकृत आणि वस्तुनिष्ठ श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, अशी मागणी शिवसेना उबाठाचे भरत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महापालिकेच्या ११ सप्टेंबर २०२६ रोजीच्या माहितीनुसार, शहराची दैनंदिन पाण्याची गरज २६८ एमएलडी असून प्रत्यक्षात सुमारे २१० एमएलडी पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे दररोज सुमारे ५८ एमएलडी पाण्याची तूट असल्याचे पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे.

भविष्यातील पाणी गरज भागविण्यासाठी शिलार धरणातून पाणी आणण्याचे नियोजन तसेच पाताळगंगा नदीतून अतिरिक्त पाणी आणण्यासाठी जलवाहिनीचा प्रस्ताव असल्याचे सांगितले जाते. मात्र, या प्रकल्पांना मंजुरी, उपलब्ध निधी, कामाची सद्यस्थिती, पूर्णत्वाची संभाव्य तारीख आणि त्यातून उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी याची अधिकृत माहिती नागरिकांसमोर जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पाणीटंचाईच्या काळात टँकरद्वारे होणारा पुरवठा, त्यावरील खर्च, फेऱ्या, देयके आणि निविदा प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. तसेच सिडको, पनवेल महापालिका आणि जलसंपदा विभागाची संयुक्त बैठक घेऊन सध्याच्या व भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन स्पष्ट करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## निवडक



### पनवेलच्या बाजारपेठेला गरब्याचे वेध

**खांदा कॉलनी :** नवरात्रोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने पनवेल परिसरात गरब्याचे वेध लागले आहेत. विविध गरबा आणि दांडिया कार्यक्रमांच्या तयारीला वेग आला असून, तरुणाईमध्ये पारंपरिक पेहरावाची उत्सुकता वाढली आहे. गरब्यासाठी विशेषतः घागरा-चोळी, रंगीबेरंगी चनिया चोळी, दुपट्टे तसेच आकर्षक ड्रेस बाजारात दाखल झाले आहेत. यंदा पारंपरिक आणि आधुनिक फॅशनचा मिलाफ असलेल्या पोशाखांना तरुणींची पसंती मिळत आहे. विविध रंग, नक्षीकाम, आरसे आणि आकर्षक भरतकाम असलेल्या घागरा-चोळीच्या ड्रेसची दुकानदारांकडे चौकशी वाढली आहे.पनवेल, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, कामोठे आणि खारघर परिसरातील बाजारपेठांमध्ये नवरात्रीच्या खरेदीची लगबग सुरू झाली आहे. गरबा कार्यक्रमांसाठी विशेष ड्रेससोबतच पारंपरिक दागिने, ऑक्सिडाइज्ड ज्वेलरी, बांगड्या आणि गरबा ॲक्सेसरीजचीही मागणी वाढली आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांसाठी वेगवेगळ्या रंगांचे पोशाख निवडण्याकडेही तरुणाईचा कल दिसून येत आहे. त्यामुळे नवरात्र सुरू होण्यापूर्वीच पनवेलच्या बाजारपेठांमध्ये 'वेध गरब्याचे, उत्साह नवरात्रीचा' असे चित्र पाहायला मिळत आहे.

### नशेबाजांवर कारवाईची मागणी

**पनवेल :** करंजाडे-वडघर परिसरातील शाळा, महाविद्यालये, स्मशानभूमी आणि मोकळ्या जागांमध्ये दारू व अंमली पदार्थांचे सेवन तसेच जुगाराचे प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. या प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कडक कारवाई करावी आणि संवेदनशील ठिकाणी पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी करंजाडे पोलीस पाटील कुणाल लोंढे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात निवेदन दिले आहे. सिडकोने विकसित केलेल्या करंजाडे-वडघर नोडमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक वास्तव्यास आहेत. परिसरात शाळा, महाविद्याल तसेच रहिवासी भाग असल्याने महिला व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. करंजाडे बौद्धवाडा स्मशानभूमी, कोठारी स्कूलसमोरील मैदान, टाटा पॉवर सेक्टर-४ लगत साई मंदिर परिसर, वडघर मराठी शाळेमागील परिसर आदी ठिकाणी विशेष लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.या ठिकाणी दारू व अंमली पदार्थांचे सेवन, जुगार तसेच अन्य गैरप्रकार करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करावी. तसेच अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी नियमित पोलीस गस्त व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे.

### पनवेलमध्ये गुटखा-तंबाखू जप्त

**पनवेल :** शहरातील बावन्न बंगला परिसरातील मेहेर लॉन्सजवळ प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व पानमसाल्याचा साठा बाळगल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी मोहसिन माजिद शेख (३०) याला अटक केली. ही कारवाई २६ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास करण्यात आली.पोलिसांच्या माहितीनुसार, मेहेर लॉन्सशेजारील रस्त्यावर मोहसिन शेख हा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व पानमसाला बाळगताना आढळून आला. त्याच्याकडून विविध प्रकारचे तंबाखू व पानमसाल्याचे पाउच तसेच एक बजाज कंपनीची रिक्षा असा एकूण २ लाख ४७ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालामध्ये वि-१ बिग तंबाखूचे पाउच, केसरयुक्त विमल पानमसाल्याचे पाउच तसेच वि-१ तंबाखूचे पाउच यांचा समावेश आहे. यासोबतच काळ्या-पिवळ्या रंगाची बजाज ऑटो रिक्षा (एमएच ४६ एसी १७९६) पोलिसांनी ताब्यात घेतली.या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि अजित बिरादार करीत आहेत.

### जुगारावर कारवाई

**पनवेल :** गुन्हे शाखा कक्ष दोनने जुगारावर कारवाई करत ११ जणांवर कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. अमरांते बिल्डिंग, सेक्टर ९, प्लॉट नंबर चार ,बिल्डिंग नंबर पाच, कळंबोली या ठिकाणी जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी अण्णा दादासो सपकाळ, केशव लक्ष्मण कदम, पाराजी सुदाम वराळ, किरण पुंडलिक दरे, अनिकेत मधुकर महाडिक, कादिर बाबू मुजावर (पनवेल), मयूर दत्तात्रय बेल्हेकर, अरुण सुबराव माने (कामोठे), कृष्णा भीमशंकर कोळी, दिगंबर हरिप्रसाद सिंग (उत्तर प्रदेश), रुपेश श्रीकांत शेडगे (कळंबोली) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या ठिकाणाहून एक लाख २५ हजार रुपये आणि जुगाराचे साहित्य जप्त केले.

## पालीच्या बल्लाळनगरीत भक्तीचा महासागर

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |



पाली येथील बल्लाळेश्वर मंदिरात अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त मंगळवारी दि. (२९) रोजी भाविकांचा अक्षरशः महासागर लोटला. रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशाच्या विविध भागांतून १५ हजारांहून अधिक भाविकांनी बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. पहाटेपासूनच मंदिरात दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण बल्लाळनगरी दुमदुमून गेली होती.

अंगारकी चतुर्थीनिमित्त गणेशभक्तांनी दर्शनासाठी मोठ्या संख्येने पाली गाठली. जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या पायी दिंड्यांमुळे पालीचे वातावरण भक्तीमय झाले होते. लहान मुले, महिला, तरुण तसेच आबालवृद्ध मोठ्या उत्साहाने दिंड्यांमध्ये सहभागी झाले होते. भाविकांसोबत पर्यटकांचीही मोठी गर्दी झाली होती.

### व्यवसायाला मिळाली चालना

अंगारकी चतुर्थीला मोठ्या संख्येने भाविक दाखल झाल्याने पालीतील स्थानिक व्यवसायांनाही चांगली चालना मिळाली. हॉटेल, लॉजिंग-बोर्डिंग, पेढे, पापड, लोणचे, मिरगुंड तसेच विविध प्रकारच्या वस्तूंच्या दुकानांमध्ये दिवसभर गर्दी होती. मंदिर परिसरातील दुकाने आणि हॉटेल्स भाविकांनी गजबजून गेली होती. भाविकांच्या मोठ्या संख्येमुळे स्थानिक बाजारपेठेत चांगली आर्थिक उलाढाल झाली.

### वाहतूक कोंडीने प्रशासनाची कसोटी

भाविकांची मोठी गर्दी असल्याने अनेकजण खासगी वाहने, लक्झरी बस आणि इतर वाहनांनी पालीत दाखल झाले. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर काही काळ वाहतूक कोंडीची स्थिती निर्माण झाली होती. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन प्रशासनाकडून सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेची काळजी घेण्यात आली.

## मोबाईल हॅक करून फसवणूक

| पनवेल | प्रतिनिधी |

लिंकद्वारे मोबाईल हॅक करून पाच लाख वीस हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कासिम कादर अली शेख हे सेक्टर चार कळंबोली येथे राहत असून त्यांच्या मोबाईलवर गाडीचा ट्रॅफिक चलन पडल्याचा मेसेज अनोळखी इसमाने पाठवला. मेसेजमधील लिंक कासिम यांनी ओपन करून पाहिले असता त्या लिंकद्वारे त्यांचा मोबाईल हॅक झाला आणि त्यांच्या बँक खात्यातून पाच ट्रांजेक्शनद्वारे पाच लाख वीस हजार रुपये परस्पर विड्रॉल झाले आणि त्यांची फसवणूक झाली.

## जे.एस.एमच्या विद्यार्थ्यांना आरोग्याचे धडे



| अलिबाग | प्रतिनिधी |

नशा मुक्त युवक फॉर विकसित भारत या अभियानांतर्गत मेरा स्वास्थ्य, मेरा गर्व-माझे आरोग्य, माझा अभिमान या संकल्पनेखाली जेएसएम. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी व्यसनाधीनता व व्यसनाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच पोषण आहाराचे महत्त्व या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी मनोविकारतज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे, अलिबाग यांनी व्यसनाधीनता व व्यसनाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. व्यसनाची सुरुवात कशी होते, त्याचे मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणारे परिणाम, व्यसनामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक व कौटुंबिक समस्या तसेच व्यसनापासून दूर राहण्यासाठी आवश्यक असलेली मानसिक सजगता याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कल्पना गाडे यांनी पोषण आहाराचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनातील संतुलित आहार, पौष्टिक अन्नपदार्थ, योग्य आहाराच्या सवयी आणि निरोगी जीवनशैली याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शरीराच्या आरोग्यासोबतच मानसिक आरोग्यासाठीही योग्य पोषण आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमादरम्यान व्यसनमुक्तीची शपथ व्यसनमुक्ती केंद्राच्या प्रमुख सुप्रिया जेधे यांनी विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याचा तसेच आपल्या मित्र-मैत्रिणींमध्ये आणि समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमासाठी जनता शिक्षण मंडळ, अलिबागचे अध्यक्ष डॉ. गौतम पाटील यांनी शुभेच्छा संदेश दिला. युवकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी आठवले यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. प्रविण गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले आणि डॉ. पंकज घरत यांनी केले.

## अलिबागच्या भाजी मंडई-मासळी मार्केटच्या कामाला वेग

### उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, सभापती प्रशांत नाईक यांच्याकडून कामाची पाहणी

| अलिबाग | प्रतिनिधी |



शहरातील भाजी व मासळी विक्रेत्यांसह नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अलिबाग नगर परिषदेच्या माध्यमातून भाजी मंडई आणि मासळी मार्केट उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. नियोजनबद्ध, स्वच्छ आणि सुविधायुक्त बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या या दोन्ही प्रकल्पांमुळे आगामी काळात विक्रेते तसेच नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. भाजी मंडईच्या उभारणीसाठी सुमारे ४० लाख रुपये, तर मासळी मार्केटसाठी सुमारे एक कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. दोन्ही इमारतींचे काम चांगल्या सुविधा आणि नागरिकांच्या सोयी लक्षात घेऊन करण्यात येत असून, बाजारपेठ अधिक व्यवस्थित करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

वीज व बांधकाम समितीचे सभापती प्रशांत नाईक आणि उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांनी सुरू असलेल्या भाजी मंडई आणि मासळी मार्केटच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी कामाची सद्यस्थिती, बांधकामाची प्रगती तसेच विक्रेते आणि नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या सुविधांबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली.

विक्रेत्यांना चांगली आणि सुविधायुक्त जागा मिळावी, तसेच नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि व्यवस्थित बाजारपेठ उपलब्ध व्हावी, हा या प्रकल्पामागील मुख्य उद्देश आहे. काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यावर भर आहे, असे प्रशांत नाईक यांनी यावेळी सांगितले.

भाजी आणि मासळी विक्रेत्यांसाठी स्वतंत्र व नियोजनबद्ध जागा उपलब्ध झाल्याने बाजारपेठेतील व्यवस्थापन अधिक सुटसुटीत होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर नागरिकांना खरेदी करताना अधिक चांगले आणि सुरक्षित वातावरण मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे दोन्ही प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अलिबागच्या बाजारव्यवस्थेला अधिक शिस्तबद्ध आणि आधुनिक स्वरूप मिळणार आहे. याप्रसंगी नगरसेवक ॲड. ऋषिकेश माळी, अश्विनी ठोसर, नीलम हजारे, निवेदिता वाघमारे, योजना पाटील, जमाल सय्यद तसेच नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील पेंशनर्स एकटवले

### विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |



संसदेने मार्च २०२५ मध्ये मंजूर केलेले निवृत्ती वेतन नियम मागे घेण्यात यावे, अशा विविध प्रलंबित मागण्यांसाठी रायगड जिल्ह्यातील पेंशनर्स एकटवले. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंगळवारी (दि.२९) रायगड जिल्हा पेंशनर्स संघटनाच्यावतीने धरणे आंदोलन केले.

संघटनेचे अध्यक्ष संदीप नागे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात सरचिटणीस डी. डी. पाटील यांच्यासह असंख्य पेंशनर्स सहभागी झाले होते.

महाराष्ट्र राज्य पेंशनर्स संघटनाच्या वतीने जिल्हास्तरावर मंगळवारी आंदोलन केले. रायगड जिल्हा पेशनर्स संघटनाच्या वतीने अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. दोन दिवस २४ तासांचे धरणे आंदोलन असून या आंदोलनाला पेशनर्सकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सर्व पेशनर्सने घोषणा बाजी करून धरणे आंदोलन केले.

## मोबाईलच्या दुकानात चोरी

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

मोबाईल दुकानात घरफोडी करत चोरांनी दुकानातील वेगवेगळ्या कंपन्यांचे एक लाख ९३ हजार रुपये किमतीचे मोबाईल चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हितेश पुरी हे काम करत असलेल्या महालक्ष्मी मोबाईल रिपेरिंग सेंटरमधील मुख्य शटर चोरट्यांनी उचक आत प्रवेश करून दुकानातील किमती १५ मोबाईल फोन चोरून नेले. या प्रकरणी पनवेल पोलीस अधिक तपास करत आहेत.

### सुरव ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून उत्तम काम | विविध सामाजिक उपक्रम राबविण्याची घोषणा

## माणगाव तालुका शेकाप चिटणीसपदी सखाराम जाधव

| माणगाव | प्रतिनिधी |

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आ. जयंत पाटील यांच्या आदेशाने माणगाव तालुका शेकाप चिटणीसपदी पक्षाचे निष्ठावंत ज्येष्ठ कार्यकर्ते सुरवतर्फे तळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य सखाराम जाधव यांची नियुक्ती पक्षाचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी केली आहे. जाधव यांना तशा आशयाचे नियुक्तीपत्र अलिबाग येथे नुकतेच पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील व जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांच्या सहीनीशी अधिकृत देण्यात आले.





याप्रसंगी माजी आ.जयंत पाटील व जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी जाधव यांचे विशेष अभिनंदन करीत त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जाधव यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. जाधव हे माणगाव तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत व प्रामाणिक ज्येष्ठ कार्यकर्ते म्हणून सर्वत्र ओळखले जातात. ते गेली ३५ वर्ष तालुक्यात पक्षाचे काम प्रामाणिकपणे करीत आहेत.

> माझी माणगाव तालुका शेकाप चिटणीसपदी निवड करून तालुक्यात पक्ष संघटना अधिक जोरात बांधण्याची संधी दिली आहे. त्या विश्वासाला सार्थ ठरवून पक्षाचे विचारधारा शेवटच्या घटकापर्यंत पोहचवून विकास कामांना चालना देणारा आहे. पक्षाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करेल.
>
> –सखाराम जाधव
> माणगाव तालुका शेकाप चिटणीस

ज्येष्ठ नेते जाधव हे माजी आ. जयंत पाटील यांचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. जाधव यांनी सुरव ग्रामपंचायतीचे १० वर्ष सरपंच म्हणून चांगले काम केले आहे. गावातील तंटे गावपाळीवर बसून मिटवून गावात शांतता नांदण्यासाठी त्यांनी प्रयत्न करून सुरव ग्रामपंचायतीला तंटामुक्त गाव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तालुक्यात शेकापच्या माध्यमातून जाधव यांनी विविध विकासाची कामे केली आहेत.

# रोगट व्यवस्थेचा बळी

मुंबई आयआयटीतील साहिल वाकोडे या बावीस वर्षीय विद्यार्थ्याच्या आत्महत्येवरून सध्या बरीच उलटसुलट चर्चा सुरू आहे. वाकोडे हा मागास समाजातील असल्याने त्याची जातीच्या मुद्द्यावरून हेटाळणी व छळवणूक चालू होती, असा आरोप त्याच्या आईवडिलांनी केला आहे. यामुळेच त्याने टोकाचा निर्णय घेतला, असे म्हणून त्यांनी सोमवारपासून आंदोलन सुरू केले आहे. या प्रकरणी संबंधित प्राध्यापकाविरुध्द कारवाई करण्यात आली असून, चौकशी चालू आहे. साहिल हा मूळचा यवतमाळचा. मुंबई आयआयटीमध्ये प्रवेश मिळवणे हे अत्यंत अवघड असते. अगदी राखीव जागांमधून प्रवेश मिळवायचा झाला तरीही जेईईची परीक्षा द्यावीच लागते व त्यात उच्चतम गुण मिळवावेच लागतात. राखीव आणि बिनराखीव अशा श्रेणींमधील विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये व गुणवत्तेत खूप तफावत नसते. अनेकदा विद्यार्थी जेईई देऊन येतात. पण त्यांना आयआयटीच्या कठीण अभ्यासक्रमाचा त्रास होतो. तिथे यश न मिळाल्याने ते निराश होतात. पण साहिल हा दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी होता. शिवाय यापूर्वी त्याला अभ्यासक्रम कठीण जात असल्याचे वा त्याने निराशा व्यक्त केल्याचे आढळलेले नव्हते. त्यामुळे आता अचानक हा प्रकार घडल्याने बऱ्याच शंका निर्माण झाल्या आहेत. या संदर्भात आयआयटी व्यवस्थापनाने जे उलटसुलट प्रकार केले ते मोठ्या संस्थेला शोभणारे नव्हते. या प्रकरणाचा गाजावाजा होताच त्यांनी साहिल हा सत्र परिक्षेत थर्मोडायनमिक्सच्या पेपरात कॉपी करताना पकडला गेला होता व त्याला पेपर थांबवून माघारी पाठवले गेले होते, असे जाहीर केले. साहिल हा मोबाईलचा व चॅटजीपीटीचा वापर करीत होता असेही सांगण्यात आले. साहिलवर कारवाई करणारे प्रा. दुल्ला हे नामवंत प्राध्यापक असून, त्यांनी नियमानुसारच सर्व केले असाही खुलासा करण्यात आला. एका विद्यार्थ्याचे प्राण गेलेले असताना त्याला आम्ही जबाबदार नाही, असे सांगण्याचा हा कोरडेपणा व निर्घृणपणा सर्वांनाच खटकला. साहिलने खरोखरच कॉपी केली होती क? याबाबत शंका आहेत. त्याला जातीवरून दूषणे दिली गेली, असा संशय आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस करीत आहेत. असे असताना आयआयटीच्या संस्थाचालकांनी संयतपणे चौकशीत सर्व काही बाहेर येईल अशी भूमिकात घेतली असती तर अधिक चांगले झाले असते.

## गेल्या पाच वर्षांत ४५ आत्महत्या

गेल्या पाच वर्षांमध्ये, म्हणजे २०२० पासून २०२५ पर्यंत देशभरातील २३ आयआयटी संस्थांमध्ये आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४५ आहे. त्यातील तब्बल २८ विद्यार्थी हे दलित, आदिवासी वा ओबीसी वर्गातील आहेत. हे प्रमाण चिंताजनक आहे. हुशारातील हुशार विद्यार्थी ज्याला इंग्रजीत क्रीम ऑफ द क्रीम म्हणतात, या संस्थांमध्ये प्रवेश घेतात. याच वर्गातील बाकीचे विद्यार्थी वैद्यकीय अभ्यासक्रमांना जातात. पण या दोन्हींकडे अभ्यास कठीण जातो म्हणून किंवा छळवणूक सहन होत नाही म्हणून आत्महत्येस प्रवृत्त होणाऱ्या तरुणांचे प्रमाण वाढत आहे. गेल्या वर्षी मुंबई आयआयटीतील दर्शन सोळंकीच्या आत्मघाताचे प्रकरण गाजले होते. त्यापूर्वी २०१९ मध्ये मुंबईच्या नायर इस्पितळात पदव्युत्तर अभ्यासक्रमाला असणाऱ्या २६ वर्षीय पायल तडवी हिच्या आत्महत्येने सर्वांना हादरवले होते. पायल ही तर एमबीबीएस पूर्ण केलेली विद्यार्थिनी होती. मात्र, तिला पोस्ट ग्रॅज्युएशनला पुरेसा अनुभव न देणे वा आदिवासी असल्यावरून छळवणूक करणे असे प्रकार चालू होते. हे करणाऱ्या तिच्याच वयाच्या तीन विद्यार्थिनी होत्या. त्यानंतर त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल झाले व ते प्रकरण अजून चालू आहे. अगदी गेल्याच महिन्यात दिल्लीच्या आयआयटीमध्ये अशाच एका सीनियर विद्यार्थ्याने टोकाचे पाऊल उचलले. सांगण्याचा मुद्दा असा की, जातीवरून हीन वागणूक विद्यार्थ्यांना कोणत्याही टप्प्यात सहन करावी लागू शकते. आपली गुणवत्ता सिद्ध करून पुढपर्यंत मजल मारली तरीही त्यांना हिणवले जाऊ शकते व ते त्यांना असह्य होऊ शकते. अशा गुन्ह्यांच्या विरोधात अत्यंत कडक पावले उचलायला हवीत व शिक्षाही तशीच व्हायला हवी. असे करणाऱ्यांना समाजात मान वर करता येणार नाही अशा रीतीने वागवले जायला हवे. दुर्दैवाने पोलिस तपासात या प्रकरणांना बरेच फाटे फोडले जातात. त्यातून मुंबई आयआयटीने जसा पवित्रा घेतला तसा सुरुवातीलाच घेतला की प्राध्यापकांना वाचवणे वा त्यांचे समर्थन करणे अशाच रीतीने सर्व पावले पडतात.

## परीक्षा पद्धतीचा दोष

साहिलला समजा जातीवरून काही त्रास नव्हता असे गृहित धरले तरी त्याला एक पेपर कठीण जाताच आत्महत्या करावीशी वाटावी हाही भयंकर प्रकार म्हणावा लागेल. हा आपल्या परीक्षा पध्दतीचा दोष आहे. साहिलविरुध्द कोणत्याही कारवाईची धमकी दिलेली नव्हती वा त्याचे वर्षही वाया जाणार नव्हते असा खुलासा आयआयटीने आता केला आहे. पण ही बाब साहिलपर्यंत पुरेशा जोरकसपणे पोचवली गेली नव्हती. दुसरे म्हणजे एखाद्या परीक्षेत पेपर जड जाणे म्हणजे सर्व काही संपणे नाही हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे अत्यंत गरजेचे आहे. परदेशांमध्ये असे प्रकार खूप क्वचित घडतात. याचे कारण तेथे ज्ञान तपासण्याच्या पध्दती वेगळ्या आहेत. कोणत्याही विषयातली माहिती पाठ करून तीन तासात भडाभडा ओकून येणे हे आपल्या परीक्षेचे तंत्र आहे. ते पहिलीपासून आयआयटीपर्यंत सगळीकडे सारखेच आहे. तेथे विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीचा कस लागत नाही. त्याला विषय किती कळला आहे व त्याच्यावर तो स्वतंत्रपणे किती विचार करू शकतो आहे याची चाचणी होत नाही. परदेशामध्ये असे होत नाही. तेथे विद्यार्थ्याला भारतातील हरित क्रांतीची चार वैशिष्ट्ये सांगा किंवा मनमोहनसिंगांच्या धोरणाचे दहा परिणाम सांगा असे काही विचारले जात नाही. तर धोरणांबाबत तुमचे मत काय आहे हे विचारले जाते. त्यात विद्यार्थ्याचा खरा कस लागतो. याउलट आपल्याकडे आता युपीएससी व एमपीएससीमध्येही अधिकाधिक प्रश्न वस्तुनिष्ठ, कौन बनेगा करोडपतीप्रमाणे पर्याय निवडा असे होऊ लागले आहेत. यातून खरे ज्ञान आणि ज्ञानवंत निर्माण होत नाहीत. त्यातून रोगट स्पर्धा निर्माण होते. पाठांतर करणारे बाजी मारतात व इतरांना न्यूनगंड येतो. त्यात पुन्हा विद्यार्थ्याची जात कनिष्ठ असेल किंवा तो गरीब घरातील असेल तर त्यात अधिक भर पडते. स्पर्धेत टिकाव धरणे अधिकच कठीण जाते. साहिल किंवा त्याच्यासारख्यांच्या आत्महत्यांमागची तात्कालिक कारणे काहीही असली तरी त्यांची मुळे ही या रोगट स्पर्धेमध्ये आहेत. आणि यात बदल न करता आयआयटीसारख्या संस्था जेव्हा आपलाच एक विद्यार्थी मृत्युला कवटाळतो तेव्हा त्याबद्दल सजग न होता त्यात आमचा दोष नाही असे बजावू लागतात तेव्हा तर रोगटपणाचा कळस गाठला जातो. साहिलच्या मृत्यूची चौकशी अत्यंत वेगाने व्हायला हवी. त्यातून काहीही कारणे समोर आली तरी एका हुशार तरुणाचा बळी गेला आहे याची जाणीव सर्वांनी ठेवायला हवी. त्याबाबत संवेदनशीलता दाखवायला हवी.

विचार

# स्मार्ट यूपीआय, झटपट टोल, वेगवान पेमेंट!

**_यूपीआयच्या कार्यपद्धतीमध्ये काही नव्या वैशिष्ट्यांचा समावेश झाल्याची बातमी अलिकडे लक्षवेधी ठरली. चुकीची माहिती देऊन विमा पॉलिसी विकल्याबद्दल विमा कंपनीला झालेला कोटीचा दंड ही अशीच एक दखलपात्र बातमी. दरम्यान, टोल बूथवर न थांबता पुढे जाण्याची संधी देणारी यंत्रणा सहा महिन्यांमध्ये देशभर कार्यान्वित होणार असल्याची बातमीही लक्ष वेधून गेली. परदेशी पेमेंट सोपे झाल्याची वार्ताही महत्त्वाची ठरली._**




महेश देशपांडे

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये थेट आर्थिक नसलेल्या पण अर्थकारणाशी संबंधित असलेल्या काही बातम्यांची रेलचेल राहिली. यापैकीच एक म्हणजे यूपीआयने आपल्या कार्यपद्धतीमध्ये काही नव्या वैशिष्ट्यांचा समावेश केला असून, तो लक्षवेधी ठरत आहे. चुकीची माहिती देऊन विमा पॉलिसी विकल्याबद्दल विमा कंपनीला झालेला कोटीचा दंड ही अशीच एक दखलपात्र बातमी. दरम्यान, टोल बूथवर न थांबता पुढे जाण्याची संधी देणारी तरीही टोल खात्यातून वसूल होण्याची यंत्रणा सहा महिन्यांमध्ये देशभर कार्यान्वित होणार असल्याची बातमीही अशीच लक्ष वेधून घेणारी. याच सुमारास परदेशी पेमेंट करणे सोपे झाल्याची वार्ताही महत्वाची ठरली.

डिजिटल व्यवहार अधिक सोपा करण्यासाठी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने यूपीआयमध्ये 'टॅप अँड पे' आणि 'माययूपीआय' अशी दोन नवी वैशिष्ट्ये आणली आहेत. या सुविधांमुळे केवळ पैसे पाठवणेच नव्हे, तर यूपीआयशी संबंधित अडचणी हाताळणेही सोपे होणार आहे. 'टॅप अँड पे'मध्ये 'एनएफसी'ची सुविधा असलेल्या स्मार्टफोनद्वारे एनएफसी-सक्षम पीओएस मशीनवर फोन टॅप करून पैसे देता येतील. यासाठी मोबाईल इंटरनेटची आवश्यकता नसेल. पीओएस मशीन स्वतः च्या इंटरनेट कनेक्शनद्वारे व्यवहार पूर्ण करेल. त्यामुळे दुकानांमधील पेमेंटची प्रक्रिया अधिक जलद होण्याची शक्यता आहे. या सुविधेत यूपीआयशी जोडलेल्या विविध खात्यांचा वापर करता येणार आहे. रुपे क्रेडिट कार्ड ऑन यूपीआयचाही त्यात समावेश आहे. पाच हजार रुपयांपर्यंतच्या व्यवहारांसाठी यूपीआय पिन न टाकताही पेमेंट करता येईल, तर पाच हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या व्यवहारासाठी पीओएस मशीनवर यूपीआय पिन द्यावा लागेल. दरम्यान, 'माययूपीआय' हे 'यूपीआय हेल्प'चे अधिक प्रगत रूप आहे. यात वापरकर्त्यांना यूपीआय व्यवहार आणि ऑटोपे निर्देश एकाच ठिकाणी पाहता येतील. खात्याच्या सुरक्षिततेबाबत संशय असल्यास 'सेफ्टी स्विच'च्या माध्यमातून यूपीआयमधून होणारे डेबिट व्यवहार तात्पुरते नाकारण्याची विनंती करता येईल. मोबाईल क्रमांक यूपीआयवर पैसे स्वीकारण्याच्या सुविधेतून वेगळा करण्याचीही सोय यात आहे. पैसे पाठवण्यापूर्वी संबंधित व्यक्ती किंवा व्यापाऱ्याबाबत अतिरिक्त माहिती पाहण्याची सुविधा 'माययूपीआय'मध्ये देण्यात आली आहे. त्यामुळे चुकीच्या व्यक्तीला पैसे जाण्याचा धोका कमी करण्यास मदत होऊ शकते. पात्र व्यवहारांसाठी 'ऑटोमेटेड चार्जबॅक प्रोसेसिंग'मुळे तक्रारींच्या निवारणाची प्रक्रिया जलद होण्यास मदत होणार आहे. जुन्या व्यवहारांची माहिती पुन्हा पाहण्याची आणि तो व्यवहार पुन्हा करण्याची सुविधाही 'ट्रान्झॅक्शन रिप्ले'द्वारे मिळेल.

आता एक ग्राहक अधिकारांचा पुरस्कार करणारी बातमी. विमा पॉलिसी घेताना ग्राहकाचे वय, आर्थिक क्षमता आणि त्याची गरज यांचा विचार होणे महत्त्वाचे असते. मात्र, एका ८८ वर्षीय ग्राहकाला त्याच्या वयाच्या मर्यादेपेक्षा अधिक वय असतानाही डिफर्ड ॲन्युइटी पॉलिसी विकल्याप्रकरणी कॅनरा एचएसबीसी लाइफ इन्शुरन्सवर भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने (आयआरडीएआय) एक कोटी रुपयांचा दंड ठोठावला. या प्रकरणात दर वर्षी दोन लाख रुपये प्रीमियम भरण्याची पॉलिसी चार वर्षांसाठी घेण्यात आली होती. संबंधित पॉलिसीची प्रवेशासाठीची कमाल वयोमर्यादा ८० वर्षे होती. त्यामुळे ८८ वर्षीय ग्राहकाला ही पॉलिसी कशी विकली गेली, याची नियामकाने चौकशी केली. पॉलिसी कॅनरा बँकेमार्फत विकण्यात आली होती. तपासात ग्राहकाची आर्थिक स्थिती आणि त्याच्यासाठी ही पॉलिसी योग्य आहे की नाही, याची पुरेशी तपासणी झाली नसल्याचे आढळले. ग्राहकाकडून करण्यात आलेली पडताळणी, प्रस्ताव फॉर्म आणि पॉलिसीशी संबंधित आवश्यक माहिती देण्याच्या प्रक्रियेतही त्रुटी आढळल्या. ग्राहकाला कस्टमर इन्फॉर्मेशन शीट आणि प्रस्ताव फॉर्म देण्यात आला नसल्याचेही समोर आले. पॉलिसी जारी होण्यापूर्वीच प्रीमियम स्वीकारण्यात आला होता. तसेच पॉलिसीच्या कालावधीत ग्राहकाचा मृत्यू झाल्यास काय परिणाम होईल, याची आवश्यक माहितीही पुरेशा पद्धतीने देण्यात आली नव्हती. त्यामुळे विमा विक्री करताना ग्राहकाला उत्पादनाची योग्य माहिती देणे आणि त्याची गरज तपासणे किती महत्त्वाचे आहे, हे या कारवाईतून स्पष्ट झाले.

प्रकरण समोर आल्यानंतर कंपनीने संबंधित ग्राहकाची भेट घेतली आणि त्याने मागणी केल्यानंतर एकूण ४.०९ लाख रुपयांचा भरलेला प्रीमियम परत केला. यात दुसऱ्या वर्षाचा प्रीमियमही समाविष्ट होता. एजंटला देण्यात आलेले कमिशनही कंपनीने परत घेतले. याशिवाय पॉलिसीची कागदपत्रे आणि ग्राहकासाठी पॉलिसी योग्य आहे की नाही, याची तपासणी करण्याची प्रक्रिया बदलण्यात आली असून पॉलिसी जारी करण्यापूर्वी व्हिडिओद्वारे पडताळणीची व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. आयआरडीएआयने ७५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या ग्राहकांना कॅनरा बँकेमार्फत विकलेल्या सर्व पॉलिसींचे ऑडिट करण्याचे निर्देशही दिले आहेत. तसेच कॉर्पोरेट एजंट्सवरील देखरेख अधिक मजबूत करण्यास सांगितले आहे.

दरम्यान, टोलनाक्यावर वाहनांची रांग आणि त्यात वाया जाणारा वेळ लवकरच कमी होण्याची शक्यता आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी टोल भरण्यासाठी वाहनांना थांबावे लागू नये, यासाठी 'मल्टिपल लेन फ्री फ्लो' म्हणजेच 'एमएलएफएफ' व्यवस्था सुरू करण्याची तयारी असल्याचे सांगितले आहे. ही व्यवस्था फेब्रुवारी २०२७ पर्यंत सुरू होण्याची अपेक्षा आहे. फास्टॅगमुळे टोल नाक्यांवरील प्रतीक्षा वेळ आधीच मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. पूर्वी काही ठिकाणी वाहनांना सुमारे १२ मिनिटे, तर काही प्रसंगी ३० मिनिटांपर्यंत थांबावे लागत होते. फास्टॅगमुळे हा वेळ ८० ते ९० टक्क्यांनी कमी झाल्याचे सांगण्यात आले आहे. एमएलएफएफ व्यवस्थेत वाहनांना टोल नाक्यावर थांबवण्यासाठी प्रत्यक्ष अडथळे किंवा बॅरिअर असणार नाहीत. वाहन ठराविक टोल पॉइंटमधून वेगाने पुढे जाईल आणि टोलची रक्कम डिजिटल पद्धतीने वसूल केली जाईल. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होऊ शकते. फास्टॅगमुळे दरवर्षी सुमारे ७१ कोटी तासांची बचत होत असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यातून अर्थव्यवस्थेला सुमारे ६८ हजार ५०० कोटी रुपयांचा फायदा होत असल्याचा अंदाज आहे. वाहनांना कमी वेळ थांबावे लागल्याने इंधनाची बचत आणि प्रदूषणात घट होण्यासही मदत होईल.

परदेशात वस्तू किंवा सेवा विकणाऱ्या भारतीय व्यवसायांसाठी आंतरराष्ट्रीय पेमेंट स्वीकारणे आता अधिक सुलभ करण्याच्या दिशेने नवी सुविधा सुरू करण्यात आली आहे. 'जिओ पेमेंट सोल्युशन्स लिमिटेड'ने भारतीय निर्यातदारांसाठी 'क्रॉस-बॉर्डर पेमेंट' सेवा सुरू केली आहे. ऑनलाइन विक्रेते, फ्रीलान्सर, क्रिएटर्स आणि सॉफ्टवेअर सेवा देणाऱ्या कंपन्यांना याचा उपयोग होऊ शकतो. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून क्रॉस-बॉर्डर पेमेंट ॲग्रीगेटर म्हणून काम करण्याची मंजुरी मिळाल्यानंतर ही सेवा सुरू करण्यात आली आहे. निर्यातदारांना अमेरिका, ब्रिटन, युरोप, संयुक्त अरब अमिराती, सिंगापूर, मलेशिया आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांमधील ग्राहकांकडून विविध मार्गांनी पेमेंट स्वीकारता येणार आहे. या सुविधेचे महत्त्व केवळ पैसे स्वीकारण्यापुरते मर्यादित नाही. परदेशी ग्राहकांना त्यांच्या स्थानिक चलनात किंमत दाखवता येणार असून त्याच पद्धतीने पेमेंट स्वीकारण्याची सुविधाही देण्यात आली आहे. विविध चलन, बँका आणि पेमेंट भागीदारांमधील प्रक्रिया एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पेमेंट लिंक, पेमेंट पेज, होस्टेड चेकआउट, नियमित व्यवहारांसाठी इनव्हॉइसिंग तसेच सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट किट आणि एपीआय अशा सुविधा उपलब्ध असतील. कंपनीच्या माहितीनुसार, व्यवहारांचे सेटलमेंट 'टी प्लस २' पद्धतीने होईल. निर्यातदारांना पेमेंट आणि सेटलमेंटची माहिती रिअल-टाइम डॅशबोर्डवर पाहता येणार आहे.

आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये कागदपत्रे आणि नियमांचे पालन हा महत्त्वाचा भाग असतो. या सेवेत व्यवहारांवर देखरेख, डेटा सुरक्षित ठेवणे आणि एंड-टू-एंड एन्क्रिप्शन यांसारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. निर्यात पेमेंटशी संबंधित एफआयआरए आणि ई-एफआयआरए कागदपत्रे त्याच व्यावसायिक दिवशी उपलब्ध करून देण्याची सुविधाही कंपनीने नमूद केली आहे. क्रॉस-बॉर्डर व्यवहारांसाठी जिओ पेमेंट सोल्युशन्सने सिटीसोबत भागीदारी केली आहे. या माध्यमातून भारतीय व्यवसायांना जागतिक पेमेंट क्लिअरिंग, अनुपालन तपासणी आणि सेटलमेंट प्रक्रियेचा आधार मिळणार आहे. परदेशी ग्राहकांकडून पैसे मिळवण्याची प्रक्रिया सोपी झाल्यास छोट्या ऑनलाइन व्यवसायांपासून मोठ्या निर्यातदारांपर्यंत अनेकांना त्याचा फायदा होऊ शकतो.

चर्चा आजची

# खराब रस्ते आजाराला आमंत्रण



वैभव पाटील

दररोज सकाळी ऑफिसला जाण्यासाठी आणि संध्याकाळी घरी परत जाण्यासाठी दुचाकीवरून प्रवास करावा लागतो. यामुळे वेळेवर पोहोचण्यास मदत होते. तसेच, वेळेची बचत होते. मात्र, बाईक-स्कूटर चालवताना कर्मचाऱ्यांना तसेच नागरिकांच्या खराब रस्त्यांचा समना करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. पाऊस थांबताच रस्त्यावर विविध ठिकाणी धुळीचे साम्राज्य पसरले पाहायला मिळत आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांतील कोरड्या चिखलामुळे निर्माण झालेल्या धुळीच्या त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. तसेच, या प्रदूषणामुळे आजाराचा धोका वाढला आहे. रस्त्यांवरील पडलेल्या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ पसरू लागली आहे. उखडलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असल्यामुळे रस्त्यावरून मोठे वाहन गेल्यानंतर मागून जाणाऱ्या दुचाकी चालकाच्या नाका-तोंडात धूळ जाते. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रवाशांसह चालक व पादचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या गलथान कारभारामुळे खोकला, सर्दी, घसा दुखण्यासारखे आजार वाढण्याची भिती निर्माण झाली आहे.

या उखडलेल्या रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून नागरिकांना खड्डे चुकवण्यासाठीही कसरत करावी लागत आहे. धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या वर्दळीमुळे रस्त्यांवरील खडी मातीची धुळ उडत आहे. रस्त्यावर काही काळ थांबल्यास संपूर्ण धूळ अंगावर थराप्रमाणे साचत असून याच दरम्यान श्वसनातून शरीरात धूळ जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकांचे आजारी होण्याचे प्रमाण देखील वाढल्याचे चित्र आहे. या धुळीचे कण अनेकांच्या नाका तोंडात जात आहे. त्यामुळे काही जण नाक दाबून तर काही जण तोंडाला कपडा बांधून प्रवास करीत आहेत. दुचाकी चालकासह तीन चाकी, चार चाकी या खासगी वाहनांसह सरकारी वाहनांमधील चालकांना आणि पादचारी प्रवाशांना या धुळीचा त्रास होत आहे. धुळीच्या प्रमाणात दुपटीने वाढ झाली आहे. या धुळीमुळे ॲलजी तसेच श्वसनाच्या विकाराची लागण होत असून, त्याचे दूरगामी परिणाम आरोग्यावर होत आहे. खराब रस्त्यामुळे वाहन चालकांना कंबर, पाठ व माण दुखीची आजार मोठ्या प्रमाणात जडले आहेत. तर वाहने देखील खुळखुळी होत आहेत. त्यामुळे नागरिकांना शारीरीक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावे लागत आहे. शहरात सुरु असलेल्या पाणी पुरवाठ व भुयारी गटारी योजनेमुळे अजुन किती दिवसा रस्ता दुरुस्तीसाठी वाट पाहवी लागणार आहे. खराब रस्त्यामुळे नागरिकांना गेल्या दोन वर्षात ज्येष्ठ नागरिक व विशेषताः तरुणांईला कबर, मान व पाठदुखीचे आजार जडले आहेत. तर वाहन देखील मोठ्या प्रमाणात नादुस्त होऊन खुळखुळी होत आहेत. खराब रस्त्यांमुळे शारीक, मानसीक व आर्थिक हानी मोठ्या प्रमाणात होत आहे.

पूर्वी साठ वर्षांनंतर कंबरेत, पाठीत व मानेमध्ये गॅप पडण्याचे प्रकार रुग्णांमध्ये दिसायचे. परंतु, आता कमी वयातील लोकांना सद्धा कंबर, मान व पाठ दुखींच्या त्रास होत आहेत. गेल्या पाच वर्षांत चाळीसगावात कंबर, मान व पाठ दुखींच्या रुग्णांची संख्या प्रचंड वाढली आहे. विशेषताः तरुणामध्ये हे प्रमाण मोठ्या प्राणात दिसून येत आहे. या मागच्या मुळ सर्वसधारण कारणांमध्ये खराब रस्ते म्हणता येईल, कारण आज प्रत्येकाकडे दुचाकी व इतर वाहने आहेत. त्यामुळे दुचाकी चालकांना खराब रस्त्यांचा प्रचंड त्रास होत आहे.

या रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती न केल्यास धुळीचा प्रश्न कायम राहील. रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मातीमिश्रीत मुरुम टाकला जात असल्यामुळे आणखीनच धुळीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे रस्त्यांवर चष्म्याविना किंवा तोंडाला दुपट्टा न बांधता वाहन चालवणे अवघड झाले आहे. यामुळे अपघाताला एकप्रकारे निमंत्रण दिले जात आहे. धुळीमुळे वातावरण दूषित होत असून, प्रदूषित हवेमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. धुळीमुळे दीर्घकालीन आरोग्याच्या समस्येने श्वसनक्रियेत अडचणी निर्माण होत असून, प्रचंड धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढीस लागले आहेत. काहींना सर्दी, खोकला, घसा दुखण्याचे आजार होऊ लागले आहे. सरकारी दवाखान्यांसह खासगी दवाखान्यात या आजाराच्या उपचारासाठी रुग्णांची गर्दी होत असल्याचे चित्र आहे. धूळ श्वासावाटे शरीरात जाते. त्यानंतर धूलिकण श्वसनात जमा होतात. हे धूलिकण श्वसनातून शरीरात, फुफ्फुसात, श्वसननलिकेत जातात. ॲलर्जीचा त्रास होणार्यांना सर्दी, खोकला, कफ होणे, धाप लागणे असे त्रास होतात, तर काहींना सर्दी, खोकला आणि घशात दुखणे असे त्रास होत आहेत. या धूलिकणाचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे श्वसनाची क्षमता कमी होत जाणे होय.

दिवाळीच्या निमित्ताने खरेदीसाठी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी नागरिकांची ये-जा सुरु झाली आहे. तसेच, पर्यटकही त्यांच्या वाहनांमधून या मार्गावरून प्रवास करीत आहेत. परंतु मातीचे कण व धुळीमुळे प्रवास करणे नकोसे झाले आहे. वारंवार मागणी करूनही या रस्त्याच्या कामाचा वेग प्रशासनाकडून वाढवला जात नसून या रस्त्यासाठी अनेकदा आंदोलनेदेखील केली आहेत. मात्र तरीही प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांची या जाचातून कधी सुटका होणार, असा प्रश्न त्रस्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.

लोकसंसद

## देशातील ५ कोटी मुले शाळेत स्वच्छता सुविधांपासून वंचित

नुकताच जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) आणि संयुक्त राष्ट्रे बालनिधीच्या (युनिसेफ) 'संयुक्त निरीक्षण कार्यक्रमा'द्वारे (जॉइंट मॉनिटरिंग प्रोग्राम) 'शाळांमधील पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि आरोग्य स्वच्छता (हायजीन) यांबाबतची प्रगती २०१५-२०२५' या शीर्षकाखालील अहवाल प्रकाशित करण्यात आला. या अहवालात नमूद केल्यानुसार २०२५ मध्ये जगभरातील १४६ देशांतील ज्या २४.४ कोटी मुलांना शाळांमध्ये स्वच्छता सुविधा उपलब्ध नव्हत्या, त्यापैकी सुमारे ५ कोटी मुले आपल्या भारतातील आहेत. हे प्रमाण कोणत्याही देशाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. या अहवालानुसार भारतातील सुमारे २ कोटी मुलांना शाळेत आरोग्य स्वच्छतेची (हायजीन) आणि १.२ कोटी मुलांना पिण्याच्या पाण्याची पुरेशी सुविधा मिळत नाही. असे असले तरी २ ऑक्टोबर २०१४ रोजी सुरू झालेल्या स्वच्छ भारत अभियानामुळे या मूल्यांकन काळात भारतातील स्वच्छता सुविधा नसलेल्या शाळांच्या प्रमाणात १४ टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे. तसेच, शाळांमधील पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत भारताची कामगिरी तुलनेने चांगली राहिल्याचे अहवालात म्हटले आहे. भारतानंतर शाळांमध्ये स्वच्छता सुविधा उपलब्ध नसलेली ३ कोटी ४० लाख मुले नायजेरियात, २ कोटी ६० लाख इथिओपियामध्ये, १ कोटी १० लाख काँगोचे लोकशाही प्रजासत्ताकमध्ये आणि ८० लाख इंडोनेशियामध्ये होती. सरकारने या अहवालातील भारताच्या संदर्भातील निष्कर्षांचे गांभीर्य ओळखून युद्धपातळीवर उपाययोजना गरजेचे आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन

जगभरात सर्वत्र विविध भाषा बोलल्या जातात. आणि आता आपली भाषा सोडून इतर भाषा येणेही गरजेचे झाले आहे. आणि इथेच त्या भाषेचा अनुवाद आणि अनुवादकर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे आजचा हा खास दिवस त्यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. आता कोणीही कोणत्याही भाषेत लिहिलेले पुस्तक वाचू शकतो. कोणत्याही भाषेत तयार झालेले चित्रपट समजू शकतात. इतर लोक त्यांच्या भाषेत काय म्हणतात ते समजू शकते. त्याला ती भाषा येत नसली तरी. आता लोकांना काही कळत नसेल तर भाषांतरामुळे हे सर्व शक्य आहे. त्यामुळे तो लगेच गुगलवर भाषांतर करतो. कोणाला स्पॅनिश भाषेतील चित्रपट बघायचा असेल तर. म्हणून तो त्यासाठी भाषांतरित सबटायटल्स इन्स्टॉल करण्याचा प्रयत्न करतो. ३० सप्टेंबरला जगभरात आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा केला जाणार आहे. जीवनातील भाषांतराचे महत्त्व समजून घेण्यासाठी हा खास दिवस आहे. ३० सप्टेंबर रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा केला जातो. जगात अनेक लोक भाषांतरकार म्हणून काम करत आहेत. त्या सर्वांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. तिथे त्याचा इतिहास बोलायला हवा. त्यामुळे हा दिवस सेंट जेरोमची पुण्यतिथी म्हणून साजरा केला जातो. सेंट जेरोम हे बायबलचे भाषांतरकार आहेत.

सेंट जेरोम हे अनुवादकांचे संरक्षक आणि संत म्हणून ओळखले जातात आणि त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पुण्यतिथीला आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा केला जातो. सेंट जेरोम हे ईशान्य इटलीचे धर्मगुरू होते. त्याने लॅट्रीनमधून बायबलच्या अनेक हस्तलिखितांचे ग्रीकमध्ये भाषांतर केले. त्याने हिब्रू गॉस्पेलचे काही भाग ग्रीकमध्ये भाषांतरित केले.

इंटरनॅशनल ट्रान्सलेशन डे, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ट्रान्सलेटर म्हणजेच ने जगभरातील अनुवादकांच्या समुदायाला एकत्र आणण्यासाठी हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ट्रान्सलेटर किंवा ची स्थापना १९५३ साली झाली. १९९१ मध्ये, अनुवादकांच्या आंतरराष्ट्रीय महासंघाने जगभरातील अनुवादक समुदायाची ओळख वाढवण्यासाठी हा दिवस आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. अनुवादक वेगवेगळ्या भाषांतील साहित्य, ज्ञान आणि विचार यांची देवाणघेवाण सुलभ करतात. ते विविध संस्कृती आणि समुदायांना जोडण्याचे काम करतात, ज्यामुळे जागतिक संवाद, समजूतदारपणा आणि सहकार्य वाढते. या दिवसाचा उद्देश अनुवादाच्या माध्यमातून भाषांतर आणि भाषिक अडथळे दूर करून ज्ञानाचा प्रसार करणे आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, कला आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत अनुवादकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अनुवादाच्या माध्यमातून लोक एकमेकांच्या भाषा, संस्कृती आणि परंपरांचा आदर करतात आणि जागतिक एकात्मता वाढते. भारताबद्दल बोलायचं झालं तर, उत्तरेत राहणाऱ्या नागरिकांना दक्षिणेतील भाषा येत नाहीत, पण तरीही त्यांनी बनवलेले चित्रपट सर्वत्र लोकप्रिय आहेत. कारण हे चित्रपट इतर अनेक भाषांमध्ये डब केले जातात. जेणेकरून भारताबरोबरच बाहेरच्या देशांनाही हे दक्षिणेचे चित्रपट पाहता येतील. यासोबतच इतर देशांतील अनेक चित्रपट भारतीय भाषांमध्ये अनुवादित केले जातात. जेणेकरून आपण ते चित्रपट पाहू शकू. मग जेव्हा राजकारणाचा विषय येतो तेव्हा आपलं मत मांडण्यासाठी आणि इतरांना समजून घेण्यासाठी अनुवादकाची गरज असते. पाहिले तर जगातील देशांना जोडण्यात अनुवादक महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या योगदानाचा गौरव करण्यासाठी आंतरराष्ट्रीय अनुवाद दिनफ सुरू करण्यात आला आहे. २४ मे २०१७ रोजी, संयुक्त राष्ट्र महासभेने ३० सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा करण्याचा ठराव मंजूर केला. तेव्हापासून जगभरात ३० सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा केला जातो.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**३० सप्टेंबर**

१) श्रीम.सुनिता मधुसूदन नाईक जोगळेकर, अलिबाग दि.३०-०९-१९३८

२)श्री.शरद शंकर बोभाटे बंदर विभाग, अलिबाग दि.३०-०९-१९५०

३)श्रीम.आयरीन एझेक आवासकर अलिबाग, दि.३०-०९-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**विश्वनाथ (विलास) निगळ्ये,ठाणे**



**शशिकांत यशवंत म्हात्रे, अलिबाग**



**स्व. कांतिलाल दामजी नागदा, स्मरणार्थ, विद्यानगर अलिबाग**



**स्व. चंद्रशेखर जगन्नाथ सरमळकर, स्मरणार्थ, बोरिवली**

# नदीकाठाला कचऱ्याचा विळखा

## • विसर्जन घाटावर कोंबड्यांची घाण, दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका

**| चणेरा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील प्रतिष्ठित आंबेवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत विसर्जन घाट आणि नदी परिसर कचऱ्याच्या ढिगांनी व्यापला आहे. कोंबड्यांची घाण, दुर्गंधी आणि नदीपात्रात टाकला जाणारा कचरा यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

आंबेवाडीला आमदार, खासदार आणि विविध राजकीय पदाधिकाऱ्यांचे नेतृत्व लाभलेले आहे. मात्र असे असतानाही साधा स्वच्छतेचा प्रश्न सुटत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. विकासाच्या घोषणा करणाऱ्या नेत्यांना नदीकाठची ही दुर्दशा दिसत नाही का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.



राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या आंबेवाडीत नदी स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत? विसर्जन घाटासारख्या पवित्र ठिकाणी कचऱ्याचे ढीग असणे हे ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह आहे.

सामाजिक कार्यकर्ते राकेश लोखंडे यांनी नदी परिसराची तातडीने स्वच्छता करून कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. ‘‘दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त आहेत. रोगराई पसरली तर जबाबदार कोण?’’ असा सवालही त्यांनी केला आहे.

ग्रामसेवक पाटील यांनी सांगितले की, कोंबड्यांची घाण टाकणाऱ्यांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. डम्पिंग

### ■ आंबेवाडीत स्वच्छतेचा प्रश्न कायम

ग्राउंड नसल्याने समस्या निर्माण झाली असली तरी नदीत कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. तसेच, दोन-तीन दिवसांत पोलिसांत तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बलाढ्य राजकीय नेतृत्व, प्रतिष्ठित ग्रामपंचायत आणि विकासाचे दावे असूनही आंबेवाडीचा साधा कचरा प्रश्न सुटत नसेल, तर या विकासाच्या गप्पा कशासाठी? नदी स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि कायमस्वरूपी डम्पिंगची व्यवस्था तातडीने करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात



**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल तालुका माणगाव पतसंस्थेच्या भागधारकांची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा शनिवारी (दि.२६) संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स, निजामपूर रोड, माणगाव येथे संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली.

सभेच्या सुरुवातीस उपस्थित सर्व संचालक मंडळ, भागधारक, मान्यवर मंडळींचे संस्थेतर्फे चेअरमन आनंद यादव व सहकारी संचालकांनी स्वागत केले. त्यानंतर संस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. सभेत मार्गदर्शन करताना संस्थेचे चेअरमन यादव यांनी सांगितले की, पतसंस्थेची स्थापना दि.१७ डिसेंबर १९९८ रोजी करण्यात आली असून प्रत्यक्षात संस्थेचे कामकाज १९९९ पासून सुरु झाले. संस्थेची सभासद संख्या १७८५ इतकी असून वसूल भागभांडवल १ कोटी ७७ लाख ८५ हजार रुपये आहे. संस्थेत २७ कोटी २६ लाख ८८ हजार रुपयांच्या ठेवी असून ९६९५ इतकी ठेवीदार संख्या आहे. संस्थेतर्फे आतापर्यंत २० कोटी ३८ लाख इतके कर्जवाटप करण्यात आले असून ४११ इतकी कर्जदारांची संख्या आहे. संस्थेची थकबाकी नेट एनपीए १.४९ टक्के असून गुंतवणूक ११ कोटी १० लाख ५१ हजार रुपये आहे. तर निव्वळ नफा ४७ लाख २३ हजार रुपये इतका आहे. सर्वांच्या सहकार्याने दरवर्षी पतसंस्थेची भरभराटी होत असून मे महिन्यात संस्थेची इंदापूर शाखा सुरु केली. तसेच, पतसंस्था १ फेब्रुवारीला वर्धापनदिनी नवीन जागेत स्थलांतरित होणार असल्याचे त्यांनी सांगितले.




## सचीन डाकी, मंगला डाकी पुरस्काराने सन्मानित

**वाघ्रण** : हाशिवरे मोकल आळी येथील सचिन रामदास डाकी व मंगला डाकी या उभयतांना रविवारी (दि.२०) कलासाधना सामाजिक संस्था नवी मुंबईच्या वतीने सामाजिक कार्याचा समाज भूषण राष्ट्रस्तरीय सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेकापचे कोकणचे माजी आ. बाळाराम पाटील उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संपत आहीर माजी प्राचार्य उपआयुक्त दुग्ध व्यवसाय, सतीश देशमुख, जगविख्यात जादूगार, जेष्ठ सिने अभिनेत्री आशा नाते आदी मान्यवर उपस्थित होते. सचिन डाकी आणि मंगला डाकी यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत संस्थेच्या अध्यक्षा मेघा जाधव यांनी या उभयतांची पुरस्कारासाठी निवड केली.

## जनार्दन वडेकर यांचा सेवानिवृत्ती सोहळा



**माणगाव** : खरवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळ संचालित नूतन माध्यमिक विद्यालय, खरवली येथील क्रीडा शिक्षक जनार्दन काशीराम वडेकर हे आपल्या नियत वयोमानानुसार ३० सप्टेंबर २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी ३८ वर्षे २ महिने प्रदीर्घ सेवा बजावली. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त विद्यालयात रविवारी (दि.२७) निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेच्या वतीने अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वडेकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विद्यालयाच्या वतीनेही त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर, संस्था पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी, सहकारी शिक्षक आणि कुटुंबीयांनी वडेकर यांच्या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा, क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला.

# खारघरमध्ये ‘युरोपियन रोलर’चे दर्शन

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

खारघर सेक्टर-१ परिसरात नुकतेच ‘युरोपियन रोलर’ या आकर्षक स्थलांतरित पक्ष्याचे दर्शन झाले आहे. पक्षी अभ्यासक माधव आठवले यांच्या निरीक्षणात हा पक्षी आढळून आला असून, त्याचे छायाचित्रही टिपण्यात आले आहे.



निळसर-हिरवट छटा असलेले शरीर, तपकिरी पंख आणि काळसर चोच यामुळे हा पक्षी सहज लक्ष वेधून घेतो.

युरोपियन रोलरचे शास्त्रीय नाव कोरासियास गॅरुलस असून तो रोलर कुटुंबातील पक्षी आहे. भारतात हा प्रामुख्याने ‘पॅसेज मायग्रंट’, म्हणजे स्थलांतराच्या मार्गावरून जाणारा पक्षी म्हणून नोंदला जातो. विशेषतः पश्चिम आणि वायव्य भारतातून ऑगस्ट ते नोव्हेंबरदरम्यान त्याचे स्थलांतर दिसून येते. महाराष्ट्रातही या पक्ष्याच्या नोंदी उपलब्ध आहेत.

युरोपियन रोलरचा प्रजनन प्रदेश युरोपपासून मध्य आशियापर्यंत पसरलेला आहे. भारतातील काही भागातून तो स्थलांतराच्या काळात पुढे आफ्रिकेकडे जातो. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात खारघरमध्ये त्याचे दर्शन होणे पक्षीनिरीक्षकांसाठी विशेष नोंद ठरते, असे निरीक्षण पक्षी अभ्यासाच्या माहितीतून करता येते.

### ■ पक्षी अभ्यासकांचे वेधले लक्ष

महाराष्ट्रासाठीच्या ‘स्टेट ऑफ इंडियाज बर्ड्स नोंदीनुसार युरोपियन रोलर हा ‘प्रवासातील स्थलांतरित’ आणि ‘स्थानिक उन्हाळी स्थलांतरित’ म्हणून नोंदला आहे. त्याची जागतिक संवर्धन स्थिती किमान चिंताजनक आहे, तर भारतात त्याचा समावेश वन्यजीव संरक्षण कायद्याच्या अनुसूची-२ मध्ये करण्यात आला आहे.

खारघरमधील वाढत्या नागरीकरणाच्या परिसरातही विविध स्थलांतरित पक्ष्यांचे दर्शन होत असल्याने येथील मोकळी मैदाने, झाडे आणि हिरवाईचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

## निवडक



### नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान

**अलिबाग** : अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी माजी नगरसेवक आर. के. घरत, सचिवपदी कोमसापचे जिल्हा प्रतिनिधी नंदू तळकर, तर संचालकपदी चारुशीला शरद कोरडे यांची निवड झाली आहे. याबद्दल प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंच व प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय, अलिबाग यांच्या वतीने सोमवारी (दि.२८) त्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभात मंचाचे कार्यवाह तसेच शासनाचा ‘ग्रंथमित्र’ पुरस्कार प्राप्त नागेश कुळकर्णी यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी समर्पित भावनेने कार्य करण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी ज्येष्ठ नाट्यकर्मी तथा साप्ताहीक कोकणनामाचे उपसंपादक शरद कोरडे, ॲड. राजेंद्र जैन, अलिबाग सार्वजनिक वाचनालयाचे माजी ग्रंथपाल भालचंद्र वर्तक, अलिबाग सार्वजनिक वाचनालय तसेच जिल्हा ग्रंथालयाचे कार्यवाह संतोष बोंद्रेसर, रायगड जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष विकास पाटील, कवी-लेखक विनोद टेंबुलकर, हेमकांत सोनार, मंदार कुळकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.



### माहितीचा अधिकार विश्लेषण कार्यक्रम

**वाघ्रण** : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघ्रणमध्ये सोमवारी (दि.२८) माहितीचा अधिकार या विषयावर विश्लेषण चर्चा संवाद कार्यक्रम पार पडला. मुख्याध्यापिका सुजाता गुंजाळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमात रायगड भूषण पत्रकार शाळा माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष दिपक पाटील यांनी मार्गदर्शन केले. माहितीचा अधिकार कायदा सहमत, कोणती माहिती या अधिकाराने मागता येत, अर्ज कसा करावा, कोणती माहिती कोणाकडे मागता येते याचा फायदा काय आदींबाबत उपस्थितांना माहिती दिली. त्याचबरोबर नारंगी केंद्राचे प्रमुख गिरीधार थळे यांनी अधिकार आणि आलेले अनुभव उदाहरण देत स्पष्ट केले. तर मुख्याध्यापिका सुजाता गुंजाळ यांनी देखील काही मुद्दे विश्लेषीत केले. या कार्यक्रमात सहशिक्षिका शुभदा पाटील, रुपाली गोडबोले तसेच विद्यार्थ्यांच्या सहभाग होता.




### फेस्कॉमची वार्षिक सभा उत्साहात

**श्रीवर्धन** : महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघ (फेस्कॉम)ची कोकण प्रादेशिक विभागाची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवारी (दि.२८) वक्रतुंड सभागृह, श्री गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली येथे उत्साहात पार पडली. दीप प्रज्वलन व प्रार्थना गीताने सभेची सुरूवात झाली. सभेचे सूत्रसंचालन प्रादेशिक सचिव दीपक करकरे यांनी केले. अध्यक्ष विलास काळे यांनी प्रादेशिक विभागाच्या एकूण कामकाजाचा आढावा घेतला. सभेमध्ये दीपक करकरे व कोषाध्यक्ष नितीन जोशी यांनी मांडलेल्या प्रस्तावांना चर्चेअंती सभेने मान्यता दिली. विवेक देशपांडे (उपाध्यक्ष, मुख्यालय) व मीरा कुलकर्णी, सदस्य, महिला समिती हे विशेष निमंत्रित म्हणून सभेला उपस्थित होते. विवेक देशपांडे, श्या. पाटील, मीरा कुलकर्णी यांनी सभेला संबोधित केले. टी.जे.एस.बी.च्या दोन प्रतिनिधींनीही आपले विचार मांडले. सभेला मालती राऊतराव, माधुरी येल्लापूरकर, डॉ. वृंदा कौजलगीकर, विठ्ठल मुंगी, विनायक थत्ते, पिंपुटकर, सदानंद कुमठेकर, नरगोलकर, अजय फाटक यांचे विशेष सहकार्य लाभले.



### वक्तृत्व स्पर्धेत सहर्ष नांदगावकर प्रथम

**कोर्लई** : मुरुड तालुक्यातील नांदगाव केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता सहावी ते आठवीच्या गटामध्ये सहर्ष हेमंत नांदगावकर याने प्रथम क्रमांक पटकावला. तो श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव येथील विद्यार्थी आहे. नांदगाव केंद्राचे केंद्रप्रमुख दिनेश म्हात्रे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन त्याला गौरवण्यात आले. या स्पर्धेकरिता नांदगाव केंद्रातील शाळा, हायस्कूल यांनी सहभाग घेतला होता. तसेच या स्पर्धेकरिता केंद्रातील शिक्षक चेतन चव्हाण, हेमंत नांदगावकर, राजेंद्र सालावकर, हेमंत गोयजी, प्रमिला फुंदे, पल्लवी भोईर, शिद, सागर बागडे आदी शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी सहर्ष नांदगावकर यांस पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### ६२ लाखांची वीज चोरी उघडकीस

**कल्याण** : विविध गैर मार्गाने वीज वापर करणाऱ्या कल्याण पूर्व परिसरातील वीज चोरांवर महावितरणकडून सर्जिकल स्ट्राईक करण्यात आला असून आतापर्यंत आठ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणकडून मिळालेल्या माहितीनुसार, या महिन्यात कल्याण पूर्व परिसरातील नेवाळी, खांबालपाडा, पिसवली या भागात गैरमार्गाने वीज वापरणाऱ्या ग्राहकांच्या विरोधात मोहीम हाती घेण्यात आली. या ठिकाणी एकूण २६१ वीज चोरीच्या घटना उघडकीस आल्या. वीज चोरट्यांनी २ लाख ८३ हजार युनिटची वीज चोरी केल्याचे आढळून आले. याचे मुल्यांकन ६१ लाख ९४ हजार रुपये आहे. दिलेल्या मुदतीत तडजोड शुल्क न भरल्याने महावितरणकडून वीज कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये नेवाळी येथील समीर जाधव, किशोर जाधव, खाबालपाडा गावातील विकास पवार, पुनम चोरगे, निशांत ढांके, पिसवली गावातील भारत सानप, राम दुगे, धामटन गावातील सुचित्रा सुर्वे या ग्राहकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# माणूस म्हणून जगताना...

**आयुष्य शिस्तीत जगावं, मस्तीत नाही. माणूस म्हणून जन्म मिळाला आहे, तर माणूस म्हणूनच जगावं. निसर्गाने माणसाला एक विलक्षण देणगी दिली आहे विचार करण्याची, चूक ओळखण्याची, बदलण्याची आणि दुसऱ्याच्या वेदना समजून घेण्याची क्षमता. वाघ जगतो, सिंह जगतो, पक्षी जगतात, मुंग्या जगतात. प्रत्येक जीव आपापल्या स्वभावानुसार जीवन जगतो.**

**संजय कचरे**

माणसाला निसर्गाने केवळ जगण्यासाठी नव्हे, तर समजून, जाणून आणि मानवतेने जगण्यासाठी बुद्धी आणि विवेक दिला आहे. म्हणूनच मला वाटतं, माणसाने आयुष्य केवळ स्वतःभोवती केंद्रित करू नये. स्वतःकडे पाहण्याची हिंमत असावी, आयुष्यात अधूनमधून थांबून स्वतःलाच काही प्रश्न विचारले पाहिजेत. मी चुकतोय का? माझ्या वागण्यामुळे कुणाला विनाकारण दुःख होतंय का? माझ्या शब्दांनी कुणाच्या मनाला जखम होतेय का? मी माझ्या जबाबदाऱ्यांपासून पळतोय का? मी फक्त माझ्या सुखाचा आणि गरजांचा विचार करतोय का? माझ्यात बदल करण्यासारखं काही आहे का? हे प्रश्न दुसऱ्याला विचारण्यापेक्षा स्वतःला विचारण्याची प्रामाणिकता माणसामध्ये असली पाहिजे.

स्वतःचं परीक्षण करणं म्हणजे स्वतःला कमी लेखणं नाही. उलट, स्वतःच्या चुका स्वीकारण्याइतका मोठेपणा मिळवणं होय. जमिनीवर राहणं हीच खरी उंची. आयुष्यात यश मिळालं, पैसा मिळाला, पद मिळालं, प्रसिद्धी मिळाली, अधिकार मिळाला म्हणून माणसाने स्वतःला इतरांपेक्षा मोठं समजू नये. माणूस किती उंच गेला यापेक्षा, तो किती जमिनीवर राहिला हे महत्त्वाचं आहे. अहंकार माणसाला इतरांपासून दूर करतो; नम्रता माणसाला माणसांशी जोडते. आपण कितीही मोठे झालो तरी आपल्या आयुष्यात आपल्याला साथ देणाऱ्या माणसांची, कुटुंबाची, समाजाची आणि निसर्गाची जाणीव ठेवली पाहिजे. पाय जमिनीवर आणि विचार आकाशाएवढे हीच खरी उंची.

**फक्त स्वतःसाठी जगणं पुरेसं नाही :** स्वतःच्या गरजा पूर्ण करणं चुकीचं नाही. स्वतःच्या आनंदाचा विचार करणंही चुकीचं नाही. पण संपूर्ण आयुष्य फक्त ‘माझ्यासाठी’ जगणं हळूहळू माणसाला आतून रिकामं करू शकतं. आपल्या आयुष्यात काही जबाबदाऱ्या असतात. कुटुंबाप्रती, मुलांप्रती, जोडीदाराप्रती, आई-वडिलांप्रती, मित्रांप्रती आणि समाजाप्रती. या जबाबदाऱ्या ओझं म्हणून नव्हे, तर आपल्या अस्तित्वाचा एक भाग म्हणून स्वीकारायला हव्यात. सगळ्यांसाठी स्वतःला विसरून जगणं आवश्यक नाही; पण स्वतःपुरतं जगणंही पुरेसं नाही. आपल्या आनंदात दुसऱ्याच्या आनंदाचा वाटा असावा आणि आपल्या यशात दुसऱ्याच्या जीवनाला थोडी तरी उभारी मिळावी.

**व्यसन नव्हे, विवेक हवा :** माणूस दुःखापासून पळण्यासाठी अनेक मार्ग शोधतो. काही जण व्यसनांच्या आहारी जातात, काही रागात जगतात, काही स्वतःच्या जगात इतके रमून जातात की त्यांच्या आसपासच्या माणसांना काय वाटतंय, याची जाणीवच राहत नाही. पण दुःख विसरण्यासाठी केलेली प्रत्येक गोष्ट दुःख संपवतेच असं नाही. व्यसन क्षणभर विसरायला लावू शकतं; पण जबाबदारीपासून मुक्त करत नाही. खरं धैर्य म्हणजे स्वतःच्या वेदनांकडे पाहणं, त्या स्वीकारणं आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करणं. काळानुसार स्वतःमध्ये बदल करायला हवा ‘मी असाच आहे’ हे वाक्य अनेकदा आपल्या विकासाचा अडथळा बनतं. काळ बदलतो. परिस्थिती बदलते. नाती बदलतात. आपल्या जबाबदाऱ्या बदलतात. त्यामुळे आपली मानसिकता, विचार आणि वर्तनही आवश्यकतेनुसार बदलण्याची तयारी असली पाहिजे. पूर्वी आपण एखाद्या गोष्टीकडे ज्या पद्धतीने पाहत होतो, तीच पद्धत आयुष्यभर योग्य असेलच असं नाही. चूक लक्षात आली तर बदलणं ही कमजोरी नाही. बदल स्वीकारण्याची तयारी हीच मानसिक परिपक्वतेची खूण आहे.

**सहानुभूती माणसाची खरी ओळख :** समोरचा माणूस काय अनुभवतोय, हे समजून घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सहानुभूती. प्रत्येकाच्या आयुष्यात काही न दिसणाऱ्या लढाया असतात. म्हणून कोणावर लगेच निर्णय देण्यापूर्वी एक क्षण थांबून विचार करावा ‘कदाचित हा माणूसही काहीतरी सहन करत असेल.’ आपण प्रत्येकाची समस्या सोडवू शकत नाही. पण आपल्या शब्दांनी एखाद्याला आणखी दुखावण्यापासून स्वतःला थांबवू शकतो. कधी कधी मोठी मदत म्हणजे पैसा देणं नसतं. कधी शांतपणे ऐकून घेणं, कधी दोन प्रेमाचे शब्द बोलणं, कधी चुका माफ करणं, आणि कधी फक्त ‘‘मी तुझ्यासोबत आहे’’ असं म्हणणं हीसुद्धा मानवता आहे.

माझ्या आयुष्यातून मिळालेली एक शिकवण माझ्या आयुष्यातील काही अनुभवांनी मला एक गोष्ट खूप खोलवर शिकवली. एका व्यक्तीचं जगणं केवळ त्या व्यक्तीपुरतं मर्यादित नसतं. आपण ज्या पद्धतीने जगतो, त्याचा परिणाम आपल्या जवळच्या माणसांवर होतो. आपल्या सवयी, आपली व्यसनं, आपला राग, आपली बेफिकिरी, आपली उदासीनता किंवा स्वतःपुरतं जगण्याची वृत्ती यांच्या सावल्या अनेकदा कुटुंबातील इतरांच्या आयुष्यावर पडतात. बालपणात किंवा आयुष्याच्या एखाद्या टप्प्यावर मिळालेल्या काही अनुभवांमुळे मनावर खोल जखमा निर्माण होऊ शकतात. आत्मविश्वास कमी होऊ शकतो. स्वतःबद्दल कमीपणाची भावना निर्माण होऊ शकते. पण त्या वेदनांमध्ये आयुष्यभर अडकून राहण्यापेक्षा त्यातून एक शिकवण घेता येते. ‘‘माझ्यामुळे माझ्या जवळच्या माणसांना अशी वेदना मिळू नये.’’ भूतकाळ बदलता येत नाही. पण त्या भूतकाळातून आपण आपल्या पुढच्या आयुष्याची दिशा नक्की बदलू शकतो. हीच कदाचित वेदनेची सर्वात सकारात्मक परिणती आहे.

**मानवतेचा अर्थ काय?**

माझ्यासाठी मानवता म्हणजे मोठमोठ्या गोष्टी करणं नाही. मानवता म्हणजे आपल्या माणसांची काळजी घेणं. आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे निभावणं. चूक झाली तर ती मान्य करणं. अहंकार कमी करणं. व्यसनांपासून दूर राहणं. दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव ठेवणं. गरज असेल तेव्हा मदतीचा हात देणं. स्वतःच्या विचारांमध्ये बदल करण्याची तयारी ठेवणं आणि आपल्या अस्तित्वामुळे दुसऱ्याचं आयुष्य थोडं तरी चांगलं होईल याचा प्रयत्न करणं. माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्याकडे काहीच नसतं. आयुष्यभर तो अनेक गोष्टी मिळवतो. पण शेवटी त्याच्या मागे राहतात त्या त्याने किती कमावलं यापेक्षा, त्याने किती जपलं आणि किती माणुसकी दिली याच्या आठवणी.

शेवटी वाघाने वाघासारखं जगावं. पक्ष्याने पक्ष्यासारखं जगावं. मुंगीने मुंगीसारखं जगावं. पण माणसाने माणूस म्हणून जगावं. निसर्गाने आपल्याला बुद्धी दिली आहे. ती अहंकारासाठी नव्हे, विवेकासाठी वापरूया. निसर्गाने आपल्याला हृदय दिलं आहे ते केवळ स्वतःसाठी नव्हे, तर दुसऱ्याच्या वेदना जाणण्यासाठी वापरूया. निसर्गाने आपल्याला आयुष्य दिलं आहे ते केवळ उपभोगण्यासाठी नव्हे, तर अर्थपूर्णपणे जगण्यासाठी वापरूया. आयुष्य मस्तीत नव्हे, शिस्तीत जगूया. अहंकारात नव्हे, नम्रतेत जगूया. फक्त स्वतःसाठी नव्हे, तर आपल्या माणसांसाठी जगूया. आणि सर्वांत महत्त्वाचं माणूस म्हणून जन्म मिळाला आहे, तर शेवटपर्यंत माणूस म्हणूनच जगूया. कारण आयुष्याची खरी किंमत आपण किती जगलो यात नाही; तर आपल्या जगण्यामुळे किती माणसं जपली गेली, किती मनं दुखण्यापासून वाचली, आणि आपल्या अस्तित्वाने किती माणसांना आधार मिळाला यात आहे.

# बाप्पाच्या नगरीतील कारागिरांचा गणेशोत्सव

## || साखर चौथ गणपतीला मिळतेय हायटेक झळाळी || गणेश मूर्तिकारांसाठी आनंदाची पर्वणी

| पेण | प्रतिनिधी |

पेण म्हटलं की डोळ्यांसमोर येतो तो गणपती... आणि गणपती म्हटलं की आठवते ती पेणची मूर्ती! महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातच नव्हे तर देशाच्या विविध भागांत विराजमान होणाऱ्या गणरायाला आकार देण्याचे काम पेणमधील हजारो कारागीर वर्षभर अहोरात्र करत असतात. मातीच्या गोळ्याला देवत्व देताना त्यांचे हात थांबत नाहीत. दिवस-रात्र मेहनत, कल्पकता, कौशल्य आणि भक्तीच्या बळावर हे कारागीर बाप्पाचे रूप साकारत असतात.

मात्र एक गंमत अशी की, ज्यांच्या हातून लाखो घरांमध्ये गणरायपोहोचतो, त्याकारागिरांनाच गणेशोत्सवाचा आनंद मनसोक्त लुटता येत नाही. गणेशोत्सवाच्या काळात त्यांच्यावर कामाचा ताण अधिकच वाढतो. मूर्तींची मागणी, सजावट, रंगकाम, अंतिम रूप देणे, वाहतूक अशा विविध कामांमध्ये ते व्यस्त असतात. म्हणूनच अनंत चतुर्दशीनंतर येणारी संकष्टी चतुर्थी अर्थात साखरचौथ पेणच्या गणेश कारागिरांसाठी एका वेगळ्याच आनंदाची पर्वणी ठरते.

काळ बदलला तसे उत्सवाचे स्वरूपही बदलले. आज साखरचौथीच्या गणपतीला हायटेक प्रसिद्धी मिळताना दिसते. सोशल मीडिया, आकर्षक व्हिडिओ, रील्स, लाईटिंग, डिजिटल स्क्रीन आणि विविध आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मंडळे आपल्या उत्सवाची माहिती मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचवत आहेत. पेणच्या गणेशमूर्तींना केवळ कलाकुसरीचे सौंदर्य नाही, तर त्यामागे हजारो कारागिरांच्या कष्टाचा घाम आहे. एखाद्या मूर्तीच्या डोळ्यांमध्ये जीव ओतताना कारागिराची नजर किती बारकाईने काम करते, हे त्या मूर्तीसमोर उभे राहिल्यावरच जाणवते. आकार, प्रमाण, भाव, रंग आणि सजावट यांचा अचूक मेळ घालताना अनेक पिढ्यांचे कौशल्य या कलेत उतरलेले आहे.



### बाप्पाही त्यांचा अन् आनंदोत्सवही त्यांचा!

साखर चौथीच्या दिवशी पेण, पनवेल आणि उरण तालुक्यांमध्ये गणेशोत्सवाचा एक वेगळा रंग पाहायला मिळतो. विशेषतः पेणमध्ये या उत्सवाला मोठी परंपरा आणि भक्तिभावाची जोड आहे. वर्षभर बाप्पाला आकार देणारे कारागीर या दिवशी मात्र स्वतःच्या बाप्पाची मनोभावे पूजा करतात. गणरायाच्या चरणी नतमस्तक होतात आणि वर्षभराची मेहनत, कष्ट आणि धावपळ काही काळ बाजूला ठेवून उत्सवाचा आनंद घेतात. ज्यांनी इतरांच्या घरचा बाप्पा घडवला, त्यांच्याच अंगणातला बाप्पा त्या दिवशी विशेष असतो. ही भावना साखर चौथीच्या उत्सवाला एक वेगळे महत्त्व प्राप्त करून देते.

### पेण शहरात उत्सवाला आले भव्य स्वरूप

पेण शहरात साखरचौथीचा गणपती आता केवळ कारागिरांचा घरगुती उत्सव राहिलेला नाही. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक मंडळांच्या सहभागामुळे या उत्सवाने भव्य स्वरूप धारण केले आहे. शहरातील अनेक मंडळे मोठ्या भक्तिभावाने गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करून पूजा-अर्चा करतात. गणरायाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये सामाजिक मंडळांसोबतच विविध राजकीय विचारांच्या कार्यकर्त्यांची गणेश मंडळेही सहभागी होताना दिसत आहेत. त्यामुळे साखरचौथीचा गणपती उत्सव हा पेणच्या सामाजिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे.

### मिरवणुकीत भक्तीबरोबरच उत्साहाची चुरस

या उत्सवातील सर्वाधिक आकर्षण असते ते म्हणजे गणरायाची मिरवणूक! एकापेक्षा एक आकर्षक सजावट, रोषणाई, ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्ये, भगवे झेंडे आणि गणेशभक्तांचा जल्लोष अशा वातावरणात पेण शहर अक्षरशः गणेशमय होते. आपल्या मंडळाची मिरवणूक अधिक आकर्षक, शिस्तबद्ध आणि दिमाखदार कशी होईल, यासाठी मंडळांचे कार्यकर्ते मेहनत घेतात. त्यामुळे मिरवणुकीत एक प्रकारची निरोगी स्पर्धा पाहायला मिळते. मात्र या स्पर्धेच्या केंद्रस्थानी असतो तो एकच गणपती बाप्पा!



● चिरनेर येथील अंकुश परदेशी मित्र मंडळाने साखरचौथ गणेशोत्सव निमित्ताने साकारलेल्या अष्टविनायकातील मोरगावच्या मोरेश्वराच्या रूपातील गणपती बाप्पाची प्रतिकृती आणि मंदिराचा सुंदर देखावा.



● पेणमधील वढाव येथील दिनेश म्हात्रे यांच्या घरी विराजमान झालेले साखरचौथ गणपती बाप्पा.




● अलिबाग तालुक्यातील रायवाडी-आक्षी येथील श्री गणेश मित्र मंडळ आयोजित साखरचौथ गणेशोत्सवनिमित्त विराजमान रायवाडीचा राजाची विलोभनिय मूर्ती



● वेश्वी येथील ओमकार क्रीडा मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ वेश्वी यांच्या वतीने विराजमान केलेली साखरचौथ गणपतीमूर्ती ( छायाचित्र : समीर मालोदे )

## विघ्नहर्ता साखरचौथ गणपतीचरणी कार्यक्रमांची पर्वणी

| कोर्लई | प्रतिनिधी |



मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या भाविकांचे श्रद्धास्थान मानल्या जाणाऱ्या नांदगावच्या शिवशाही प्रतिष्ठान आयोजित साखरचौथ गणेश उत्सव मित्र मंडळातर्फे बाजारपेठेतील नांदगावचा विघ्नहर्ता साखरचौथ गणपतीची स्थापना मोठ्या उत्साहात करण्यात आली. यंदाच्या पुजेचा मान दिपेश मोदी यांना मिळाला.

नांदगावच्या विघ्नहर्ता साखरचौथ गणपतीचे सोमवारी (दि.२८) आगमन झाले. मंगळवारी (दि.२९) सकाळी ९.०० वा.श्री मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठापना, आरती करण्यात आली. यानिमित्ताने सायंकाळी ७.०० वा. ते रात्री ९.०० वा. नांदगाव येथील अक्षय भाटकर व कल्पेश मळेकर यांच्या भजनाचा सुश्राव्य बहारदार कार्यक्रमाने रसिक जनांची मने रिझवली. कार्यक्रमाचे औचित्य साधून रात्री १०.०० वा. महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम व रात्रौ १२.०० वाजता महाआरती घेण्यात आली.

## चिरनेरमध्ये विघ्नहर्त्याचे अकरा दिवस दर्शन

| चिरनेर | प्रतिनिधी |

चिरनेर कातळपाडा येथील विघ्नहर्ता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा गणपती बाप्पा नवसाला पावणारा म्हणून परिसरात ओळखला जातो. या गणरायाच्या दर्शनासाठी साखरचौथ गणेश उत्सवात हजारो भक्तांचा सागर चिरनेर गावात लोटतो. मंडळाच्या साखरचौथ गणेशोत्सव मूर्तीच्या रंगसंगतीचे उत्कृष्ट काम मूर्तिकार नरेश हातनोलकर, जितेश हातनोलकर प्रतिभा हातनोलकर यांनी केले आहे. मंडळाचे हे १९ वर्ष असून, गणेशोत्सवाच्या अनुषंगाने सजावटीसह गणेशोत्सवातील शेवटच्या दिवसाची भव्य मिरवणूक हे मंडळाचे विशेष आकर्षण ठरत असून मिरवणुकीत गुलालाची उधळण न करता गणरायावर आणि सहभागी भक्तांवर पुष्पवृष्टी केली जाते. तर मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार, किंवा अनावश्यक धांगडधिंगा न करता पारंपारिक व सांस्कृतिक पद्धतीने गणरायाला निरोप दिला जातो, अशी माहिती विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दिली.




## रेवदंड्याचा राजा उत्साहात विराजमान

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंडा मित्र मंडळाच्या वतीने आयोजित साखरचौथ गणेशोत्सव रेवदंड्याचा राजा या सार्वजनिक गणेशोत्सवाची प्रतिष्ठापना मंगळवारी (दि.२९) भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. रेवदंडा भैरवनाथ मंदिर, रेवदंडा हायस्कूलसमोर गणरायाची विधिवत पूजाअर्चा करून प्रतिष्ठापना करण्यात आली. प्रतिष्ठापनेनंतर गणेशभक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. परिसरात आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली असून, गणेशोत्सवामुळे रेवदंडा परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



गणेशोत्सवानिमित्त मंडळाच्या वतीने अथर्वशीर्ष आवर्तन, भजन, महाआरती तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि. ३०) गणेशमूर्तीची मिरवणूक व विसर्जन सोहळा ढोलपथकाच्या गजरात होणार आहे.

## दापोलीमध्ये गौरागणपती उत्सव

**पनवेल :** गौरा गणपती उत्सवानिमित्त पनवेल तालुक्यातील दापोली येथे यंदा विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दापोलीचे माजी सरपंच सुभाष म्हात्रे यांच्या पुढाकाराने गौरागणपती एकता व दक्षता गणेश मित्र मंडळ तसेच सुयोग स्पोर्ट्स, दापोली यांच्या वतीने गौरा गणपती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या उत्सवानिमित्त भाविकांसाठी गणरायाच्या दर्शनाची विशेष व्यवस्था करण्यात आली असून, परिसरातील नागरिक तसेच भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी करत आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## ढोल-ताशांच्या गजरात मुरूड बाजारपेठच्या राजाचे आगमन !

### १० सार्वजनिक तर २५ घरगुती गणपती विराजमान

| आगरदांडा | प्रतिनिधी |

ताशांचा आवाज तरारला आणि ढोल-ताशांच्या गजरात मुरूड बाजारपेठचा राजा वाजतगाजत भक्तिमय वातावरणात विराजमान झाला. मुरूड बाजारपेठ मित्र मंडळाच्या वतीने साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त गणरायाचे जल्लोषात आगमन करण्यात आले. बाजारपेठेतील भाजीमार्केटजवळ उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात मुरूड बाजारपेठ राजाची प्रतिष्ठापना करण्यात आली.



अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाला वाजतगाजत निरोप दिल्यानंतर पाच दिवसांनी येणाऱ्या संकष्ट चतुर्थीला साखरचौथ गणपतीची स्थापना करण्याची परंपरा आहे. मुरूड बाजारपेठेत येणारा हा एकमेव साखरचौथ गणपती असल्याने मुरूड शहरासह पंचक्रोशीतील शेकडो भाविक दर्शनासाठी येथे गर्दी करतात.

दरम्यान, मुरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीत साखरचौथ निमित्त १० सार्वजनिक आणि २५ घरगुती गणपतींचे आगमन झाले असल्याची माहिती मकरंद पाटील यांनी दिली. गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा यासाठी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## आगरी-कोळी बांधवांमध्ये उत्साहाचे उधाण | वेळास आगर येथे उत्सवाचे ४ थे वर्ष

# साखरचौथ गणपतीचे थाटात आगमन

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

अनंत चतुर्दशीला मुख्य गणेशोत्सवाची सांगता झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच कोकण, रायगड, ठाणे आणि मुंबईच्या किनारपट्टी भागात बाप्पाचे पुन्हा एकदा जल्लोषात पुनरागमन झाले आहे. निमित्त आहे पारंपरिक आणि श्रद्धेचा सण असलेल्या साखरचौथ उत्सवाचे.



विशेषतः पेण, पनवेल, उरण, मुरुड, रोहा, पालघर आणि श्रीवर्धन परिसरातील आगरी-कोळी समाजामध्ये या सणाला दिवाळीसारखे महत्त्व असते. गणेश चतुर्थीच्या काळात ज्यांच्या घरात सुतक किंवा इतर काही कारणांमुळे बाप्पाची मूर्ती आणता आली नव्हती, त्या परिवारांनी या दिवशी गौरा गणपती म्हणजेच साखरचौथ गणपतीची स्थापना करून गणेशोत्सव साजरा केला जातो. श्रीवर्धन तालुक्यातील निसर्गरम्य समुद्रकिनारी वसलेल्या वेळास आगर या चिमुकल्या खेडेगावात श्री साखरचौथ गणपतीचे यंदा ४ थ्या वर्षात अत्यंत उत्साहात आगमन झाले आहे. या दीड दिवसांच्या उत्सवासाठी वेळास आगरसह परिसरातील सर्व ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने एकत्र आले आहेत.सकाळी बाप्पाच्या मूर्तीची विधिवत पूजा-अर्चा आणि आरती करून सोहळ्याची सुरुवात झाली. याप्रसंगी बालगोपाळांचे भजन तसेच स्थानिक भजनी मंडळाकडून सादर करण्यात आलेल्या गणपतीच्या गाण्यांनी संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला. उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणून रात्री श्रीवर्धनमधील सुपरहिट शक्ती-तुरा या पारंपरिक लोककलेचा रंगतदार सामना आयोजित करण्यात आला आहे.

## पितृपक्षातील साखरचौथ गणपतीला भक्तिभावाचा उत्साह

| खांदा | वार्ताहर |



पितृपक्षातील साखरचौथ गौरा गणपतीचा उत्सव रायगड जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. पितृपक्षात गौरा गणपतीची स्थापना करण्याची परंपरा रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी आजही जपली जात आहे.

पनवेल, खांदा कॉलनी तसेच परिसरातील विविध सोसायट्यांमध्ये साखरचौथ गौरा गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

महिलावर्गाकडून मोठ्या भक्तिभावाने गौरा गणपतीची पूजा करण्यात येत आहे.गणरायाच्या स्वागतासाठी घराच्या प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या आहेत. कापूर प्रज्वलित करून मंगलमय वातावरणात गणरायाचे स्वागत केले जात आहे.

फुलांची सजावट, दिव्यांची आरास आणि पारंपरिक पद्धतीने केलेली पूजा यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.साखरचौथ गौरा गणपतीच्या पूजेला महिलांची विशेष उपस्थिती पाहायला मिळत आहे.

## निवडक

### साखरचौथ गणपतीचे धुमधडाक्यात आगमन

**उरण :** उरणच्या ग्रामीण भागात पितृपक्षात साखर चौथीच्या गणपतीची स्थापना करण्यात येत आहे. कै. अंकुश परदेशी मित्र मंडळाने मोरगाव गणपती देखावा म्हणून चिरनेरचा राजा साकारला आहे. गावदेवी गणेश मित्रमंडळ आणि महिला मंडळ चिरनेर मुळपाडाने कोकणातील गणपतीपुळे येथील मंदिर परिसराचा देखावा साकारला आहे. श्रीराम सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ तथा कुंभार आळी सार्वजनिक गौरागणेश मंडळांनी आकर्षक सजावट करत साखर चौथीच्या गणपतीची विधिवत पूजा करून बालगोपालाच्या उपस्थित स्थापना केली आहे. त्यात साखर चौथ गणेशोत्सव हा सण अंगारकी चतुर्थीला आल्याने श्री महागणपती मंदिरात भाविकांची गर्दी उसळल्याचे चित्र पाहायला मिळत असल्याने गाव परिसरात चैतन्याचे आनंदाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या पेण, उरण आणि पनवेल या तालुक्यांतील प्रामुख्याने आगरी समाजात साखर चौथ गणेशोत्सव साजरा केला जातो. अनंत चतुर्दशीनंतर चार-पाच दिवसांनी येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला गणेशमूर्तींची स्थापना होते. दुसऱ्या दिवशी गणेशमूर्तींचे विसर्जन केले जाते. काही साखर चौथ गणपती अडीच ते पाच दिवसांचेही असतात. उरण तालुक्यातील अनेक गावांमध्ये उत्साहाचे नवचैतन्याचे वातावरण होते.

### साखरचौथ गणेशोत्सवाची धामधूम



**खांब :** साखरचौथ गणेशोत्सवाचा उत्सव साजरा करण्याची परंपरा काही वर्षापासून रोहा तालुक्यातील ग्रामीण भागात सुरू करण्यात आली असून या परंपरेनुसार ग्रामीण भागातील विविध गावांतून या गणरायाचे आगमन झाले असून या उत्सवाची मोठीच धामधूम सगळीकडे पहावयास मिळत आहे. सकाळी गणरायाचे घरोघरी तसेच सार्वजनिक ठिकाणी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात वाजत गाजत आगमण करून मोठ्या भक्तिभावाने प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. या उत्सवांतर्गत बाप्पाचे पूजन, महाआरती, हरिपाठ, भजन आदी धार्मिक कार्यक्रम तर महिला व पुरूष वर्गाने मनोरंजनाचे साधन म्हणून विविध नृत्य करून या गणरायापुढे जागर करण्याची परंपरा सुरू करण्यात आली असल्याचे पहावयास मिळत आहे. लहान मुले व महिलासाठीही विविध प्रकारचे मनोरंजनाचे कार्यक्रमांचे आयोजन करून हा उत्सव मोठ्या उत्साहात व धुमधडाक्यात साजरा केला जात आहे.

### पनवेलकरांना लालबागच्या राजाचे दर्शन

**खांदा :** लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या मुंबईतील लालबागच्या राजाचे दर्शन पनवेलकरांना यंदा थेट घेता आले. महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेच्या वतीने आयोजित गौरा गणेशोत्सवाचे हे ३४ वे वर्ष असून, यानिमित्त लालबागच्या राजाची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. गणरायाच्या दर्शनासाठी पनवेल शहरासह उपनगरातील भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. महिला, पुरुष, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने दर्शनासाठी दाखल झाले होते. गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. मुंबईतील लालबागच्या राजाच्या भव्य रूपाची प्रतिकृती पाहण्याची संधी पनवेलकरांना मिळाल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. गणरायाच्या दर्शनानंतर अनेक भाविकांनी मनोभावे पूजा करून आरती केली. महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेने गेल्या ३४ वर्षांपासून गौरा गणेशोत्सवाची परंपरा जपली आहे. त्यामुळे या उत्सवाला पनवेलमध्ये विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



### साखरचौथ गणपतीचे आगमन

**कापोली :** सुवर्ण गणेशाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक दिवेआगर नगरीत आज श्री सत्यवान सावित्री पाखाडी मित्र मंडळ यांच्या साखरचौथ गणपतीचे अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. मंडळाचे हे ९ वे वर्ष असून, दरवर्षीच्या परंपरेनुसार यंदाही बाप्पाच्या स्वागत सोहळ्यासाठी गावातील भाविक उपस्थित होते. गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष, वाद्यांचा गजर करीत रस्त्यावरून थाटामाटात बाप्पाचे पाखाडी परिसरात स्वागत करण्यात आले.या सोहळ्याचे औचित्य साधून मंडळाचे अध्यक्ष गौरव शिलकर, उपाध्यक्ष प्रशांत वारगे, सचिव तुषार पिळणकर आणि खजिनदार विरेश चोगले यांनी परिसरातील सर्व भाविकांना व नागरिकांना बाप्पाच्या दर्शनासाठी येण्याचे आवाहन केले आहे. बाप्पाच्या आगमनामुळे संपूर्ण दिवेआगर परिसरात सध्या आनंदाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **होम स्टे कामासाठी जोडपे पाहिजे** आहे. ठिकाण : चोंढी मो.नं. ८७७९७७६७१४

● **O'NEST Group of Hotels** येथे हाऊसकीपर, वेटर, ऑल राऊंडर शेफ, तातडीने हवे. ठिकाण: अलिबाग/रत्नागिरी. संपर्क: ९९७५५१६१२३.

● **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२

● **अलिबाग एसटीस्टॅन्डजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. संपर्क : ९७६४५४८६७९

● **झेरॉक्स दुकानात मराठी टायपिंगसाठी** मुलगी पाहिजे. संपर्क : ९९२१५५०१२९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उरणमध्ये मटका-जुगाराचा बाजार

**उरण :** उरण शहरासह तालुक्यात मटका आणि जुगाराचे कथित अड्डे पुन्हा डोके वर काढत असल्याची चर्चा रंगली आहे. शहरात छुप्या पद्धतीने मटका सुरू असल्याचे बोलले जात असून तालुक्यातील काही गावांमध्ये जुगाराचे अड्डे बिनधास्त सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. या प्रकारांना आळा घालणार कोण, असा संतप्त सवाल महिला वर्गातून उपस्थित होत आहे.

उरणमध्ये सुरू असलेल्या या कथित मटका-जुगाराच्या धंद्याकडे संबंधित यंत्रणेचे लक्ष आहे की नाही, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. रायगड जिल्ह्यासह नवी मुंबई परिसरातूनही जुगार खेळण्यासाठी काहींची उरणकडे ये-जा असल्याचे सांगितले जात आहे. या जुगाराच्या व्यवहारात लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचा दावा जुगार खेळणाऱ्यांकडून केला जात आहे. मटका-जुगारामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटण्याची भीती व्यक्त होत असताना महिला वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे. कष्टाची कमाई जुगाराच्या नादात उधळली जाऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाने या कथित अवैध अड्ड्यांची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या आशीलांनी मौजे - वरसे,ता.रोहा येथील ग्रुप ग्रामपंचायत वरसे यांचे हद्दीतील बिनशेती मिळकत गट क्र. ०७ हिस्सा नं. ३ अ/१ प्लॉट क्र.१, क्षेत्र ०-१७-७५ हे.आर. या सामाईक मिळकतीपैकी श्री. रघुनाथ बाळू ठाकूर, रा. हनुमान सेवा संघ, गझधर बांध, सांताक्रूझ, मुंबई यांचे मालकीचे विभक्त क्षेत्र : ३६० चौ. फुट. ही जमिन मिळकत व त्यावरील घर २६४ चौ. फुट बांधीव क्षेत्राची घर मिळकत ग्रुप ग्रामपंचायत वरसे मालमत्ता क्र.८०४ ही खालील वर्णनाची बिनशेती जमिन व त्यावरील घर मिळकत खरेदी करण्याचे ठरवले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|
| वरसे, ता.रोहा,जि.रायगड | ०७ हिस्सा नं.३ अ/१, प्लॉट क्र. १ | क्षेत्र ०-१७-७५ |

वरील सामाईक मिळकती पैकी विभक्त क्षेत्र : ३६० चौ. फुट. ही मिळकत व त्यावरील घर २६४ चौ. फुट बांधीव क्षेत्राची (लांबी २२ फुट X १२ फुट रुंदी) ही घर मिळकत, ज्याचा ग्रुप ग्रामपंचायत-वरसे मालमत्ता क्र. ८०४ असा आहे.

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबेकब्जा वाहिवाटीत, निर्वेध बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी माझ्या अशीलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागवून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- रोहा
दिनांक :- २९/०९/२०२६

सही/-
**ॲड. नितेश पा.ठाकूर**
मो. ८९८३४५८३६०
(कार्यालयीन पत्ता : ठाकूर अँड असोसिएटस,
ए-२०३, वसंतपुष्प को.ऑप.हौ.सो.लि.
अलिबाग-रायगड)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांकरीता मौजे-पेढांबे, खारपेढांबे व केतकीचामळा, ता.अलिबाग,जि. रायगड येथील कै. गणपत जवरू पाटील ह्यांचा मुलगा कै. आत्माराम गणपत पाटील यांचे वारस १. मोहन आत्माराम पाटील. २. प्रभावती कमळाकर धुमाळ ३. अंजना राजेंद्र घरत ४. रंजना पद्माकर नागांवकर यांच्या नावे मालक व भोगवटादार म्हणून असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीपैकी अविभक्त हिस्सा आम्ही खरेदीखताने विकत घेण्याबाबत आमची आपापसात बोलणी चालू आहे. त्याची मालकी हक्कांची पडताळणी आम्ही करीत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| केतकीचामळा ता.अलिबाग जि.रायगड | ५७ | वरकस ०.२६.०० पो.ख. ०.००.०० एकूण ०.२६.०० | ०.५५ |
| खार पेढांबे, ता.अलिबाग जि.रायगड | १०८ | जिरायत ०.१४.७० पो.ख. ०.०१.०० एकुण ०.१५.७० | १.९४ |
| खार पेढांबे, ता.अलिबाग जि.रायगड | १३२ | जिरायत ०.१६.९० पो.ख. ०.०३.३० एकूण ०.२०.२० | २.५६ |
| पेढांबे, ता.अलिबाग जि.रायगड | १३६ | जिरायत ०.३८.०० पो.ख. ०.०३.०० एकूण ०.४१.०० | ९.४४ |
| पेढांबे, ता.अलिबाग जि.रायगड | १९४ | जिरायत ०.५१.२० पो.ख. ०.०८.६० एकूण ०.५९.८० | १४.८२ |

तरी मिळकतीत कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जाती, शित, कर्जाचा बोजा, जमिनकी, कुळहक्क, कब्जा वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबे कब्जा वहीवादी, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारने हक्क अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसाचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे, असे समजले जाईल व विद्यमान मालकांचे सदर गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार बोलणे सफल झाल्यास खरेदीखत नोंदणीकृत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत यांची सर्वांनी नोंद घ्यावी

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २९/०९/२०२६
जमिन मिळकतीच्या मालकाच्या मान्यतेची सही

**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२/ए/बी, आई बंगला, शिवसागर वसाहत,
कुरूळ ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८८१६३७९२४
ई.मेल :sp3589166@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे आसलपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं | क्षेत्र | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| गजानन बाळू शेंडे, जनार्दन बाळू शेंडे, मंजुळा शांताराम तरे | १६/३ | ३२.६० गुंठा | ०.३९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:,
गणेश कृपा बिल्डींग फ्लॅट नंबर २०१
गारपोली पोस्ट कोषाणे ता. कर्जत,
जि. रायगड. ४१०१०१
दिनांक :- २८/०९/२०२६

सही/-
**ॲड दामिनी अरुण बासरे उर्फ गायकर**
मो. नं. ९७६७६३६०५२

## जाहीर नोटीस

दि. २९/०९/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक अमेय राजनकुमार पाटील यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| बोपोली ता.अलिबाग | ११/१/अ | ६-४९-०० पो.ख १-००-०० एकुण ७-४९-०० | १०.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी अमेय राजनकुमार पाटील यांच्या हिश्याचे एकुण क्षेत्र ०-७८-०० हे.आर., आकार १.२० रु.पै.या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२१-०० हे.आर. ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ होणाऱ्या ०७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं.७७४३८०९६५३

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मिलींद भालचंद्र पाटील, सौ.भावना अभय गुरव, सौ.वीना प्रशांत कवळे व सौ.भारती भालचंद्र पाटील यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रं. | क्षेत्र-(आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड | ५१/१/५१/२/ ५१/३/५५/२/९ | ३-६०-०० | ३६.०० |

अलिबाग,
दि. २९/०९/२०२६

MAHESH S. MHATRE
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No.1.Ch. Shivaji Chouk,
Near Gawade Optics,
Alibag Raigad

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतीचे विदयमान मालक श्री. रोहिदास वामन पाटील, व इतर ३ रा. सावरोली ता. खालापूर जि. रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कुंभारघर, ता. सुधागड, जि.रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| २७/३ | ३-२५-०० | १-२८ |

या एकूण क्षेत्रापैकी मिळकत मालकाचे क्षेत्र २-०५-०० हे. आर पैकी ०-२०-० हे. आर

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्युपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ३०/०९/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ.अनिता अनंत धनावडे रा. डाकेली, पो. बोर्ली, मांडला, ता. मुरुड यांचे सुचनेवरुन सर्वांना कळविण्यात येते की, आमचे अशिलांविरुद्ध मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात रे. मु. क्र. ४०/२०१३ चा दावा श्रीमती पार्वती कृष्णा मांजरेकर व संगिता चंद्रकांत किंजळे यांनी दाखल केलेला होता तो दावा मा. मुरुड न्यायालयाने दि. १७/२/२०२३ रोजी फेटाळलेला असून आमचे अशिलांनी दि.२०/१०/२०११ रोजीचे मृत्यूपत्र कायदेशीर असल्याबाबत प्रतिदावा केलेला होता तो प्रतिदावा मा. न्यायालयाने मान्य केला आणि दि. २०/१०/२०११ रोजीचे मृत्यूपत्र कायदेशीर असल्याचा निर्णय दिलेला आहे. सदर निकालाविरुद्ध वरील श्रीमती पार्वती कृष्णा मांजरेकर वगैरे यांनी मा. जिल्हा न्यायाधिश सो. यांचे कोर्टात दिवाणी अपिल क्र. ८/२०२३ चे अपिल दाखल केलेले असून ते मे. कोर्टात चौकशीकरीता प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत पार्वती कृष्णा मांजरेकर व संगिता किंजळे यांनी दावा मिळकत मौजे वांदेली गट नं. १९०, क्षेत्र ०-८२-७० हे. आर आकार १५-७० रु.पैसे ही मिळकत बेकायदेशीरपणे विकणेस काढण्याचे आमचे अशिलांस खात्रीलायक समजलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत वरील पार्श्वभुमी लक्षात घेवून कोणीही कोणताही व्यवहार पार्वती कृष्णा मांजरेकर व संगिता किंजळे यांचेबरोबर करु नये त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे.

तरी कोणीही व्यवहार केल्यास तो इसम प्रामाणिक खरेदीदार होणार नाही व आमचे अशिल अशा इसमांविरुद्ध कायदेशीर कारवाई करतील.

हे कळावे.
अलिबाग,
दि. २९-०९-२०२६.

**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राह्मणआळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-ममदापूर ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| गावांचे नांव | स.नं./प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ममदापूर | १५१/२९ | ४४२ चौ.मी. | ४४.२० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे नसरापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक राजेंद्र रामचंद्र भोपतकर यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे नसरापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार ( रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३३ | १५ | ०-८६-०० | १-०७ |

तरी वरील मिळकतीच्याबाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३०/०९/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर, मुद्रे खुर्द,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१ मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसाद्वारे कळिवण्यात येते की, मुळ जमीन मालक श्री.पांडुरंग परशुराम म्हामुणकर यांचे मालकीची ताबे कब्जात, वहिवाटीतील मौजे-गुंडगे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड. येथील खालील वर्णनाची जमीन असुन, खालील जमीन मिळकत आमचे अशिल मेर्स युनिक बिल्डकॉन तर्फे मालक श्रीम.ज्योती पंडित डेरे हया नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे विचारात आहेत.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे-गुंडगे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड**

| खाते क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १०० | ५० | २ | ०-१९-०० | ३.०० |

सदरच्या जमिन मिळकती निर्वेध व बोजारहीत स्वत:चे मालकीच्या वहिवाटीत असलेली सातबारा सदरी असलेली नावे जमीन मिळकत असल्याबद्दलची खात्री, जमीन मिळकतीचे मालक श्री. पांडुरंग परशूराम म्हामुणकर यांनी आमचे अशिल मेर्स.युनिक बिल्डकॉनतर्फे मालक श्रीम.ज्योती पंडित डेरे यांना कायमस्वरुपी विक्री करण्यात येणार आहे.

तरीही कोणीही व्यक्तीच्या सदर जमिन मिळकतीमध्ये किंवा जमीन मिळकतीच्या भागात विरुद्ध कब्जाने किंवा वारसा, गहाण, दान, विक्री, देणगी, लिज, चार्ज, ट्रस्ट, लायसन्स, पोटगी, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, वचनचिठ्ठी किंवा कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी स्वत: किंवा त्यांचे अधिकारी इसमातर्फे खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांच्या आत आपण आपले जवळ असलेल्या पुराव्याचे कागदपत्रांसहीत खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात.

वरील मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. पांडुरंग परशुराम म्हामुणकर यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून मेर्स युनिक बिल्डकॉनतर्फे मालक श्रीम.ज्योती पंडित डेरे हे वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

ठिकाण-पनवेल
दिनांक-२९/०९/२०२६

**ॲड. कैलास नारायण घरत**
००२, प्राईड सी.एच.एस.लि.सेक्टर-११
भुखंड क्र.०५, माथेरान रोड, नवीन पनवेल,
जि. रायगड पीन नं. ४१०२०६
मो.नं.९५९४६५३७७७

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** केआरसीएल अंतर्गत रत्नागिरी येथील रनिंग रूमच्या सुधारणा करण्याचे काम **टेंडर क्रमांक: केआर/आरएन/ईएल/टी/26/2026 दिनांक: 30.09.2026**, **अंदाजित खर्च**– ₹45,71,146/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क**–नाही, **ईएमडी** – ₹91,430 /- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 21/10/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 30.09.2026**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - एसएसई/रत्नागिरी विभागांतर्गत डीप स्क्रीनिंग, शॅलो स्क्रीनिंग, स्लीपर बदलणे इत्यादी कामे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-16ए (दुसरे आवाहन), अंदाजित खर्च:** ₹ 131,65,047/-, **ईएमडी**- ₹ 2,63,300/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 22.10.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** – कोकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रातील रोहा (वगळून) ते मडुरे (समाविष्ट) स्थानकांदरम्यानच्या विभागातील बोगदे, सबस्टेशन्स, फलाट, अप्रोच रोड आणि परीसंचार क्षेत्रांमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रकाश व्यवस्थेच्या दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक देखभाल करार. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/3ए/2026 दिनांक 30/09/2026, अंदाजित खर्च** – ₹ 1,60,89,088/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 3,21,800/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 21/10/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
### जाहिर सुचना
### विद्युत विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत Manufacturer / Dealer/ Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे मागविण्यात दर येत आहे. सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/विद्युत/९९२६/प्र.क्र.०२/१०५४/२०२६
दिनांक : २९/०९/२०२६

सही/-
**विद्युत विभाग प्रमुख**
**पनवेल महानगरपालिका**

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
### जाहिर सुचना विद्युत विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील खालील कामांचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत Valid Chartered Electrical Safety Engineer कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे.

कामाचे नाव- पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका कार्यालय, शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्र, मलनिस्सारण केंद्र, जलशुध्दीकरण केंद्र व इतर इमारतींचे विद्युत सुरक्षितता तपासणी व पडताळणी (Electrical Safety Audit ) करणेबाबत.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/विद्युत/२०२५/प्र.क्र.०३/१०५१
दिनांक- २९/०९/२०२६

**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पुनाडे, ता. उरण, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| १३०/१८६ | एकूण क्षेत्र ०-६२-०० हे.आर | ८.३१ |
| १३१/३६ | एकूण क्षेत्र ०-५५-९० हे.आर | ३.०० |
| १३०/१६२ | एकूण क्षेत्र ०-४९-३० हे.आर | ६.६२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ३०/०९/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता. पेण, जि. रायगड पिन नं.४०२१०७

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड
### जाहिर फेर निविदा सुचना

मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या खालील नमुद केलेल्या कामाकरीता इच्छुक पुरवठादारांकडून जाहिर फेर निविदा सुचना मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कोरी निविदा पत्रकाची किंमत | इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीत सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही कॅमेरांचे वार्षिक देखभाल दुरूस्ती करार करणे बाबत. | १०० | ५०० |
| २ | मुरूड नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन जागेवरीलचे weigh Bridge दुरूस्ती करणे बाबत. | १०० | ५०० |

१. कोरी निविदा पत्रके दिनांक ३०/०९/२०२६ रोजी पासून दिनांक ०७/१०/२०२६ रोजी पर्यंत सायं पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.
२. सदर कामाची इसारा रक्कम रोख स्वरुपात दिनांक ०८/१०/२०२६ पर्यंत सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात स्विकारण्यांत येईल.
३. सदर कामांच्या निविदा दिनांक ०८/१०/२०२६ रोजी पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात स्विकारण्यांत येतील.
४. प्राप्त निविदा दिनांक ०८/१०/२०२६ रोजी सायं. ५.३० वाजता किंवा प्रशासकीय सोईनुसार उघडण्यांत येतील.
५. कोणतीही निविदा अगर सर्वच निविदांबाबत कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे.

म्यु.जा.क्र.६२०/आरोग्य/२०२६-२७
मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालय
मुरुड जंजिरा, जि.रायगड
दिनांक :- २९/०९/२०२६

सही/-
**(सचिन बच्छाव)**
**मुख्याधिकारी**
**मुरूड जंजिरा नगरपरिषद**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक

### गुलवीर सिंगला रौप्यपदक

**नागोया :** आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारतीय खेळाडू गुलवीर सिंगने पुरुषांच्या १५०० मीटर शर्यतीत रौप्यपदक जिंकले आहे. अंतिम फेरीत त्याने ३:३६.७२ अशी स्वतःची सर्वोत्तम वेळ नोंदवली आहे. १२ खेळाडूंच्या अंतिम शर्यतीत गुलवीर सुरुवातीपासूनच शर्यतीत टिकून राहिला आणि शेवटच्या फेरीत जोरदार मुसंडी मारत त्याने रौप्यपदक निश्चित केले. ३:३६.७२ ही वेळ गुलवीरसाठी वैयक्तिक सर्वोत्तम वेळ ठरली. सर्वात मोठ्या मंचावर कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी करत त्याने पदक विजेत्यांच्या यादीत आपले स्थान निश्चित केले. या निकालामुळे आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या थलेटिक्स पदकांच्या संख्येत आणखी एका पदकाची भर पडली; जपानी जोडीविरुद्धच्या जोरदार कामगिरीनंतर गुलवीरने पदक विजेत्यांचे व्यासपीठ गाठले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या १५०० मीटर प्रकारात गुलवीरचे हे रौप्यपदक भारतासाठी सुधारणा दर्शवणारे ठरले आहे. मागील आवृत्तीत भारताने या प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. तर, यावेळी जपानच्या काझुतो इझावाने ३:३६.३५ अशी स्पर्धेतील विक्रमी वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले.




### रेसलिंग विश्वावर शोककला!

**शिकागो :** रेसलिंग जगतातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. एइडब्लूमध्ये 'पॅक' आणि डब्लूडब्लूईमध्ये नेव्हिल या नावाने चाहत्यांमध्ये ओळखल्या जाणाऱ्या बेंजामिन सॅटरलीचे वयाच्या ४० व्या वर्षी निधन झाले आहे. विशेष म्हणजे एइडब्लूच्या मोठ्या स्पर्धेत आपला अखेरचा सामना खेळल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्याचे निधन झाले आहे. त्यामुळे सध्या क्रीडाविश्वातून हळहळ व्यक्त होत आहे. दि.२६ सप्टेंबर रोजी शिकागोमध्ये एइडब्लू ऑल आऊट इव्हेंटमध्ये बेंजामिन सॅटरलीचा सामना अँड्रे एल इडोलोशी झाला होता, त्यात त्याला पराभवाचा सामना करावा लागला होता. या सामन्यानंतर काही तासांतच त्याची तब्येत अचानक बिघडली आणि त्यानंतर रविवारी त्याचे निधन झाले.ऑल एलिट रेसलिंगने रविवारी रात्री सॅटरली यांच्या मृत्यूची घोषणा केली; परंतु, त्यांच्या मृत्यूचे कारण किंवा त्यामागील परिस्थितीबद्दल कोणतीही माहिती दिली नाही. सध्या बेंजामिन सॅटरलीच्या शेवटच्या सामन्याचे व्हिडिओ सध्या व्हायरल झाले आहेत.



### भारताची श्री चरणी अव्वल

**नवी दिल्ली :** आयसीसीने मंगळवारी (दि.२९) महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारी जाहीर केली. त्यामध्ये भारताच्या फिरकीपटूने ऐतिहासिक रेटिंग पॉइंट मिळवले आहेत. श्री चरणीने या क्रमवारीत आपल्या टी-२० कारकिर्दीतील सर्वोत्तम ८१७ रेटिंग पॉइंट मिळवले आहेत. त्यामुळे ती या प्रकारातील सर्वोच्च मानांकित गोलंदाज ठरली असून, तिने ऑस्ट्रेलियाच्या दिग्गजाला मागे टाकले आहे. श्री चरणीने ऑस्ट्रेलियाच्या मेगन शटचा २०१८ मध्ये नोंदवलेला ८०६ रेटिंग पॉइंटता विक्रम मोडला आहे. चरणीचे रेटिंग आतापर्यंतच्या महिला टी-२० आंतरराष्ट्रीय गोलंदाजी क्रमवारीतील सर्वोच्च (सर्वकालिन) रेटिंग पॉइंट ठरले आहेत. अलीकडेच २२ वर्षीय भारतीय फिरकीपटूने संघाच्या विजयी आशिया चषक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेच्या सुवर्णपदकाच्या मोहिमेत महत्त्वाची कामगिरी केली आहे. तिने आशिया चषकात १२ बळी घेतले होते. त्यामध्ये श्रीलंकेविरुद्धच्या अंतिम सामन्यातील २० धावांत ४ बळींचा समावेश आहे. त्याचबरोबर जपानमध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत चरणीने यजमान जपानविरुद्ध १० धावांमध्ये ४ बळी घेतले होते. त्यानंतर २२ सप्टेंबरला झालेल्या सुवर्णपदकाच्या लढतीत चरणीने दोन बळी घेतले होते. तसेच, गोलंदाजी क्रमवारीत दुसऱ्या स्थानावरही भारताचीच खेळाडू आहे. दीप्ती शर्माने श्रीलंकेविरुद्धच्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात तीन बळी घेतले. त्यामुळे टी-२० आंतरराष्ट्रीय गोलंदाजी क्रमवारीत तिचे ७५४ पॉइंट झाले असून, इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन ७२३ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.



### मोहित बनणार गोलंदाजी प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२७ च्या हंगामासाठी चेन्नई सुपर किंग्ज संघ चांगलाच तयारीला लागला आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी भारताचा माजी वेगवान गोलंदाज झहीर खान याची नव्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली होती. आता सीएसकेच्या नव्या गोलंदाजी प्रशिक्षकाबाबत मोठी माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वेगवान गोलंदाज मोहित शर्मा याची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे. याबाबत अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. सीएसकेचे सीईओ कासी विश्वनाथन यांनी म्हटले, ''मोहित सीएसकेमध्ये आमचा नवीन गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून सामील होईल. त्याचे नाव आमचे मुख्य प्रशिक्षक झहीर खान यांनी सुचवले होते. खेळाडू म्हणूनही मोहितची कामगिरी आमच्यासाठी उत्कृष्ट होती आणि गोलंदाजी प्रशिक्षक म्हणूनही तो उत्तम काम करेल, अशी आम्हाला आशा आहे.''



### शोएब अख्तरचे क्रिकेटमध्ये पुनरागमन?

**नवी दिल्ली :** शोएब अख्तर अनेक वर्षांनंतर पाकिस्तान क्रिकेटमध्ये पुनरागमन करू शकतात. गेल्या आठवड्यात माजी वेगवान गोलंदाज अख्तर यांनी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांची भेट घेतली, त्यानंतर त्यांना बोर्डात मोठे पद दिले जाण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीसीबीशी संबंधित सूत्रांनी सांगितले की, काही आठवड्यांपूर्वी जेव्हा शोएब अख्तर यांच्या मोठ्या भावाचे निधन झाले होते, तेव्हा मोहसीन नक्वी यांनी अख्तर यांच्याशी वैयक्तिकरीत्या संवाद साधला होता. नक्वी यांनी त्यांच्या भावाच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला होता. सूत्राने पुढे खुलासा करताना सांगितले, ''शोएब अख्तर यांना खूप मोठे पद मिळू शकते. तथापि, जेव्हा त्यांची अध्यक्षांशी भेट झाली, तेव्हा त्यांनी पाकिस्तान क्रिकेटला पुढे नेण्यासाठी आपले विचार स्पष्टपणे मांडले होते.''



# नीरु ढांडाचा 'सुवर्ण' निशाणा

## दोन पदकं जिंकून रचला इतिहास | ठरली पहिली भारतीय नेमबाज

**| नागोया | वृत्तसंस्था |**

**जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या खात्यात पाचवे सुवर्णपदक आले आहे. नेमबाज नीरु ढंडा हिने सुवर्ण निशाणा साधत इतिहास घडवला आहे. तिने महिलांच्या वैयक्तिक ट्रॅप प्रकारात सुवर्णपदकाची कमाई केली आहे. हे तिचे स्पर्धेतील दुसरे पदक ठरले आहे.**



२६ वर्षीय नीरु ही वैयक्तिक ट्रॅप प्रकारात सुवर्णपदक जिंकणारी पहिलीच भारतीय महिला नेमबाज ठरली आहे. विशेष म्हणजे हे सुवर्णपदक जिंकण्याच्या काही तास आधीच तिने महिला ट्रॅप सांघिक प्रकारात मनीषा कीर आणि आशिमा अहलावत यांच्यासोबत रौप्यपदक जिंकले होते. त्यांनी ३२८ गुणासह पदक जिंकले होते. सांघिक प्रकारात चीनने (३४६ गुण) सुवर्णपदक आणि कुवेतने (३२५ गुण) कांस्यपदक जिंकले.

नीरु ही भारतीय लष्कराच्या नेमबाजी युनिटमधीलनायब सुभेदार असून, तिने गेल्यावर्षी आशियाई अजिंक्यपदाचे आणि यावर्षीच्या सुरुवातीला विश्व चषक शॉटगन प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. खरंतर आत्तापर्यंत रायफल आणि पिस्तूल नेमबाजीच्या तुलनेत भारत शॉटगनमध्ये तितकी पदके जिंकत नाही. त्यामुळे तिचे यश विशेष आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नीरुने तिचा चुलत भाऊ लक्ष्य शेओरन याच्याकडून प्रेरणा घेत नेमबाजीला सुरुवात केली होती. लक्ष्यने यापूर्वी २०१८ च्या जकार्ता आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ट्रॅप प्रकारात रौप्यपदक जिंकले होते. दरम्यान, नीरूच्या अंतिम फेरीवेळी पाऊस असतानाही तिने सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. नीरूने आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत २८ गुण मिळवले. तसेच, २४ गुणांचा पूर्वीचा आशियाई विक्रम मोडला. या स्पर्धेत चीनची सन युनॉन्ग २६ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिल्याने तिने रौप्यपदक जिंकले. कुवेतच्या हाजर अब्दुलमलिकने २१ गुणांसह कांस्यपदक जिंकले.

नीरुने अंतिम सामन्याला दमदार सुरुवात केली होती. तिने पहिल्या फेरीतील सर्व पाच लक्ष्ये भेदली. परंतु, दुसऱ्या फेरीत तिचे एक लक्ष्य चुकले. मात्र, तिने लगेचच सावरत पुनरागनन केले. तिने तिसऱ्या फेरीत उत्कृष्ट निशाणा साधला आणि अव्वल स्थान मिळवले. त्यानंतर तिने चौथ्या फेरीतही उल्लेखनीय कामगिरी केली. तिने चार फेरीनंतर २० पैकी १९ शॉट्स हिट केले. अंतिम टप्प्यात तिने चांगला संयम राखला आणि अखेर सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. तत्पूर्वी आशियाई क्रीडा २०२६ स्पर्धेत पुरुषांच्या ट्रॅप प्रकारात भारताच्या शपथ भारद्वाजनेही अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यामुळे त्याच्याकडूनही भारताला पदकाची आशा आहे. पुरुषांच्या सांघिक ट्रॅप प्रकारात शपथ भारद्वाज, किनान चेनई आणि अहवर रिझवी यांच्या भारतीय संघाला अंतिम फेरीत सहावे स्थान मिळाले.

### बवुमा, डी कॉकमध्ये बाचाबाची

**केप टाउन :** दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियावर ३२ धावांनी विजय मिळवला. टेम्बा बवुमा व डेव्हिड मिलर यांच्या शतकाने आफ्रिकेला ९ बाद ३६५ धावांचा डोंगर उभारून दिला. त्यानंतर गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला ३३३ धावांवर गुंडाळले. मात्र, हा सामना टेम्बा बवुमा व यष्टिरक्षक क्विंटन डी कॉक यांच्यातल्या वादामुळे चर्चेत आला. एका निर्णयावरून क्विंटन आफ्रिकेच्या कर्णधारावर प्रचंड संतापलेला दिसला आणि त्याला आवरण्यासाठी सहकारी धावले. या सामन्यातील बवुमा व डी कॉक यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यात क्विंटन डी कॉक कर्णधारावर प्रचंड चिडलेला दिसत आहे. रिव्ह्यू घेतल्यानंतर बवुमाने डी कॉककडे रोखून पाहिले आणि काहीतरी बोलला. डी कॉकसुद्धा असमाधानी दिसला आणि त्याने प्रत्युत्तर दिले. ही परिस्थिती पाहून डेव्हिड मिलर आणि मार्को यान्सेन यांना हसू आवरता आले नाही.

# भारतीय तिरंदाजांची आगेकूच कायम

**| नागोया | वृत्तसंस्था |**

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने तिरंदाजीमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. यावेळी पुरुष आणि महिला कंपाऊंड सांघिक तसेच मिश्र रिकर्व्ह आणि कंपाऊंड सांघिक प्रकारात उपांत्य फेरी गाठली.



यावेळी कंपाऊंड मिश्र संघात चिकिता तनिपार्थी आणि साहिल जाधव यांनी १६ संघांच्या फेरीत मंगोलियाला १६०-१४६ ने पराभूत केले. त्यानंतर उपांत्यपूर्व फेरीत कझाकस्तानला १५९-१५४ ने हरवून त्यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. रिकर्व्ह मिश्र संघात, धीरज बोम्मादेवरा आणि कुमकुम अनिल मोहोड यांनीही उत्कृष्ट कामगिरी केली. या भारतीय जोडीने १६ संघांच्या फेरीत युएईला ६-० ने आणि त्यानंतर उपांत्यपूर्व फेरीत व्हिएतनामला ६-० ने पराभूत अंतिम चारमध्ये प्रवेश केला. तत्पूर्वी, भारताच्या पुरुष आणि महिला कंपाऊंड संघांनीही उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. ज्योती सुरेखा वेन्नम, चिकिता तनिपार्थी आणि पृथिका प्रदीप यांच्या महिला संघाने उपांत्यपूर्व फेरीत कझाकस्तानला २३३-२३० ने पराभूत केले. तत्पूर्वी, भारतीय संघाने १६ संघांच्या फेरीत मंगोलियाला २३८-२२३ ने हरवले होते. कुशल दलाल, साहिल जाधव आणि गणेश मणिरत्नम यांच्या पुरुष संघाने उपांत्यपूर्व फेरीत भूतानला २३५-२३२ ने हरवले. भारतीय संघाने १६ संघांच्या फेरीत युएईला २३५-२१५ ने हरवले होते. पुरुष आणि महिला दोन्ही कंपाऊंड संघ आता उपांत्य फेरीत दक्षिण कोरियाचा सामना करतील. पदकांसाठीचे सामने ३० सप्टेंबर रोजी खेळले जातील.



### कराटेत नेरळचे खेळाडुंना चमकले

**नेरळ :** मुंबई-मुलुंड येथे झालेल्या ३७वी ऑल इंडिया इंटरनॅशनल कराटे स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सभागृहातील कराटे क्लासेसचे खेळाडू सहभागी झाले होते. त्यांनी या स्पर्धेत उत्तम कामगिरी केली असून, चार कराटेपटू यांनी पदके मिळवली आहेत. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी प्रशिक्षक हिरामण गवळी, नंदू म्हसकर, मानसी थवई यांच्या नेतृत्वाखाली नेरळ येथून स्पर्धेसाठी गेलेले श्रेया म्हसे आणि जिया माळी या दोघींनी सुवर्णपदक पटकावले आहे. तर संस्कार म्हसे याने रौप्य, तर कौशल गवळी याने कांस्यपदक मिळवले आहे. त्यांच्या या यशाबद्दल कौतुक होत आहे.

# भालाफेकीत भारताचा 'डबल धमाका'

**| नागोया | वृत्तसंस्था |**

आशियाई क्रीडा स्पर्धेत सोमवारी (दि.२८) पुरुषांच्या भाला फेक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने दोन पदक प्राप्त केले आहेत. यावेळी यशवीर सिंहने रौप्य, तर रोहित यादवने कांस्यपदक प्राप्त केले आहे. तसेच, या स्पर्धेचे सुवर्णपदक श्रीलंकेच्या रुमेश थारंगाने पटकावले.




नागोया सिटी मिजुहो पार्क ॲथलेटिक स्टेडियममध्ये भारताच्या यशवीर सिंहने ८५.७२ मीटरच्या सर्वोत्कृष्ट थ्रोसह दुसरे स्थान आपल्या नावे केले. यशवीरने आपल्या सहाव्या प्रयत्नात ८५.७२ मीटरची दुरी गाठली. त्याअगोदर त्याचा सर्वोत्कृष्ट प्रयत्न हा ८५.१४ होता. यशवीरने पहिल्या प्रयत्नात ८३.५६ मीटर, दुसऱ्या प्रयत्नात ८२.९९ मीटर, तिसऱ्या प्रयत्नात ८२.४२ मीटर आणि चौथ्या प्रयत्नात ८४.३१ मीटरची लांबी गाठली. त्याचा पाचवा प्रयत्न ८५.१४ मीटरचा राहिला. दुसरीकडे, रोहित यादवने ८४.३५ मीटरसोबत आपली सर्वोत्कृष्ट कामगिरी करत आपल्या देशाला कांस्यपदक मिळवून दिले. रोहितने तिसऱ्या प्रयत्नातच हे यश प्राप्त केले होते. त्याने पहिल्या प्रयत्नात ७७.२५ मीटर, दुसऱ्यात ८२.४० मीटर, तिसऱ्यात ८४.३५ मीटर, चौथ्यात ८२.१६ मीटर आणि पाचव्या प्रयत्नात ८२.१५ मीटरचा थ्रो केला. त्याचा सहावा प्रयत्न हा फाउल राहिला.

### अव्वल चार संघांची निश्चिती

**नवी दिल्ली :** अशियाई क्रीड स्पर्धेच्या क्रिकेट उपांत्य फेरीचे वेळापत्रक ठरले आहे. त्यामुळे पुरुषांच्या क्रिकेटचा पहिला उपांत्य सामना गुरुवार, दि. १ ऑक्टोबर रोजी पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात खेळवला जाईल. तर, दुसरा उपांत्य सामना भारत आणि श्रीलंका यांच्यात त्याच दिवशी सुरू होईल. त्यामुळे आता उपांत्य सामन्यात कोणत्या संघांना विजय मिळतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणारे आहे.



### पोर्तुगालचा नॉर्वेवर थरारक विजय

**| ओस्लो | वृत्तसंस्था |**

उलेवाल स्टेडियमवर झालेल्या युईएफए नेशन्स लीगच्या ग्रुप-४ सामन्यात गतविजेत्या पोर्तुगालने नॉर्वेचा २-१ असा पराभव केला. गोलकीपर ओरजान नायलँडच्या एका महागड्या चुकीचा फायदा घेत गोन्सालो रामोसने निर्णायक गोल केला आणि नॉर्वेची घरच्या मैदानावर सलग १४ सामने अपराजित राहण्याची मालिका खंडित केली.

सामन्याच्या सुरुवातीला नॉर्वेने आक्रमक पवित्रा घेतला असला तरी, १७ व्या मिनिटाला जोआओ फेलिक्सने गोल करत पोर्तुगालला आघाडी मिळवून दिली. याआधी जोआओ नेव्हसचा हेडर क्रॉसबारच्या वरून गेला होता. तर, दुसरीकडे अर्लिंग हॅलंडचा प्रयत्न पोर्तुगालचा गोलकीपर डियोगो कोस्टा याने हाणून पाडला होता. कोस्टाने अडवलेला चेंडू हॅलंडच्या दिशेने आल्याने त्याला आणखी एक संधी मिळाली. फम रुबेन डायसने डायव्हिंग ब्लॉक करत नॉर्वेच्या कर्णधाराला गोल करण्यापासून रोखले. कोस्टाने हॅलंडचे दोन हेडरही रोखले. आणि पहिल्या ४५ मिनिटांत पोर्तुगालने आपला गोलचा बचाव कायम राखला. या फॉरवर्ड खेळाडूने बॉक्सच्या कडेवरून शांतपणे गोल करत पोर्तुगालला आघाडी मिळवून दिली. नॉर्वेने दबाव कायम ठेवला आणि अखेरीस दुसऱ्या सत्राच्या सहाव्या मिनिटाला त्यांना बरोबरी साधणारा गोल मिळाला. हॅलंडने अगदी जवळून त्वरित प्रतिक्रिया देत गोल केला. गोलकीपरचा खराब पास थेट रामोसकडे गेला आणि त्याने ५४ व्या मिनिटाला रिकाम्या जाळीत चेंडू लोब करत पोर्तुगालची आघाडी पुन्हा मिळवून दिली. पोर्तुगालने भक्कम बचाव करत तिन्ही गुण आपल्या नावे केले. या विजयामुळे पोर्तुगाल संघ 'अ' गटात अव्वल स्थानी पोहोचला आहे.

# अशियाई स्पर्धेत रंगणार महामुकाबला

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारत-पाकिस्तान सामन्यासाठी चाहते प्रत्येक वेळी वाट पाहत असतात. आता भारतीय पुरुष हॉकी संघ आणि पाकिस्तान हॉकी संघ यांच्यात आशियाई क्रीडा स्पर्धेतील उपांत्य लढत रंगणार आहे. भारतीय संघाने 'अ' गटातील साखळी फेरीतील अखेरच्या सामन्यात बांगलादेशचा १०-० असा धुव्वा उडवला. या विजयासह भारताने 'अ' गटात पाचपैकी पाचही सामने जिंकत १० गुणांसह पहिले स्थान मिळवले आहे. त्यामुळे आता भारत-पाकिस्तान सामन्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




भारतीय पुरुष हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेतील साखळी फेरीत एकही सामना गमावला नाही. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यातही भारतीय संघाने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले. कर्णधार हरमनप्रीत सिंगने २७व्या, ४०व्या आणि ४५व्या मिनिटाला गोल करत हॅट्ट्रिक नोंदवली. शिलानंद लाक्राने दोन गोल केले. तर अभिषेक नैन, जुगराज, सुखजीत सिंग, संजय आणि मनदीप सिंग यांनी प्रत्येकी एक गोल केला. यावेळी बांगलादेशचा १०-० असा पराभव केल्यानंतर हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ आता पाकिस्तानविरुद्धच्या उपांत्य सामन्यासाठी मैदानात उतरणार आहे. हा सामना गुरूवार दि.१ ऑक्टोबर रोजी दुपारी १.०० वाजता जपान मधील गिफू प्रिफेक्चरल ग्रीन स्टेडियमवर रंगणार आहे. तर, 'अ' गटात दक्षिण कोरियाने १२ गुणांसह दुसरे स्थान मिळवले आहे. तर, 'ब' गटात मलेशियाने पाचही सामने जिंकत १५ गुणांसह पहिले स्थान मिळवले आहे.

## शिवकन्या मंडळाची दमदार कामगिरी | देवाडीकर चषकावर उमटवली मोहोर

# निवड चाचणीत कुमार-कुमारी गटांचा थरार

**| ठाणे | प्रतिनिधी |**

ठाणे जिल्हा कबड्डी असो.च्या सहकार्याने ठाणे जिल्हा कुमार-कुमारी अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे अयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा डोंबिवली (पूर्व) व भिवंडी येथे पार पडत असून, शिवकन्या मंडळाने कुमारी गटाचा देवाडीकर चषक पटकविला आहे. तर, कुमार गटात श्री मावळी मंडळ, श्री विठ्ठल मंडळ, बॉस्को स्पोर्टस्, जय बजरंग व नव तरुण संघ उपउपांत्य पूर्व फेरीत धडक दिली.



डोंबिवली(पूर्व) येथील सौ. राजश्री काळे काकू क्रीडानगरीत सुरू असलेल्या कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात ठाण्याच्या शिवकन्या मंडळाने राजर्षी शाहू महाराज मंडळाचे आव्हान ५१-३२ असे सहज परतवून लावत श्रमजीवी स्व. रमेश देवाडीकर चषकावर आपले नाव कोरले आहे. सावध सुरुवात करणाऱ्या शिवकन्या संघाने पूर्वार्धात २६-२० अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात आपला खेळ अधिक गतिमान करत सामना सहज आपल्या बाजूने झुकविला. शेरीन फतेजा, योगिनी म्हात्रे यांच्या उत्तरार्धातील जोशपूर्ण खेळाला याचे श्रेय जाते. राजर्षीच्या ज्ञानेश्वरी रनटंकी, अनुष्का चव्हाण यांचा पूर्वार्धातील जोश उत्तरार्धात कमी पडला. या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात शिवकन्याने नव तरुण मंडळावर ६८-१९ अशी, तर राजर्षी शाहुने रा. फ. नाईक वर ३८-२० अशी मात करीत अंतिम फेरी गाठली होती.

तसेच, विजय क्लब मंडळाच्या सहकार्याने भिवंडी-काल्हेर येथे मंडळाच्या पटांगणावर सुरु असलेल्या कुमार गटाच्या बाद फेरीत श्री मावळी मंडळाने स्वामी विवेकानंद संघाचा ३९-२५ असा पाडाव केला. विश्रांतीला दोन्ही संघ १७-१७ असे बरोबरीत होते. स्वरूप साळुंखे, स्वरूप कदम, आदित्य ठोंबरे श्री मावळी मंडळाकडून, तर यश पाटील, पियुष म्हात्रे यांनी पराभूत संघाकडून उत्कृष्ट खेळ केला. श्री विठ्ठल मंडळाने जॉयकुमार स्पोर्टस् वर ३८-३१ असा विजय मिळविलो. बॉस्को स्पोर्टस्ने जय हनुमान मंडळाचा प्रतिकार ३४-२८ असा मोडून काढला. श्रावण तांबे, मयुरेश वाघ यांनी बॉस्को कडून, तर साहिल चव्हाण, तुषार मानकर यांनी श्री हनुमानकडून चमकदार खेळ केला. जय बजरंग, वाशिंद ने निखिल गायकरच्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर जय हनुमान संघावर ४०-२७ अशी सहज मात केली. शेवटच्या सामन्यात नव तरुण मंडळाने वेताळ मंडळाला ३३-३२ असे चकवीत आपली आगेकूच केली. पहिल्या डावात पिछाडीवर पडलेल्या वेताळने दुसऱ्या डावात कडवी झुंज देत लढत चूरशीची केली. दुर्गेश जाधव, माणिक गराडे नव तरुणकडून, तर भुगेंद्र जोशी, अमोल शिंदे वेताळ संघाकडून उत्तम खेळले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)